


Newsletter of Melghat Tiger Reserve
Vol. No. XXX

# मेळव्याघ्र

ऑक्टोबर 2019

Oriental Scops Owl
(Rufous Morph)


View of Melghat
by Shashank Nagarale




*Newsletter of Melghat Tiger Reserve*
*Vol. No. XXX*


# मेळव्याघ्र


ऑक्टोबर 2019



# मेळघाट व्याघ्र

ऑक्टोबर 2019

**Editor:**

**M.S. Reddy**
Additional Principal Chief Conservator of Forest
& Field Director, Melghat Tiger Reserve, Amravati

**Front and Back Cover Photo:**

**Saurabh P. Jawanjal**
Oriental Scops Owl
(Rufous and Grey Morphs)

**Typesetting & Design:**

**Anand S. Vipat**
*(Graphic Designer)*


**© Published and Issued By:**
Office of the Additional Principal Chief Conservator
of Forest & Field Director, Melghat Tiger Reserve,
Amravati 444 602 (M.S.)

**Website: www.magicalmelghat.com**
**E-mail: projecttigermelghat@gmail.com**

# Index...


| | |
|---|---|
| Editorial | 1 |
| Photo Feature | 2 |
| Melghat – from the eyes of a Trekker | 4 |
| निसर्ग अनुभव | 9 |
| धगधगते जंगल आणि लोकसहभागाची गरज | 10 |
| मेळघाटातील महिलांना मिळतोय रोजगार | 13 |
| Wildlife, Culture, Tribes & Nature Ecstasy | 14 |
| मेळघाटातील जीवनदायी नद्या | 15 |
| Flattened Fauna of the Forest | 18 |
| Why Magical Melghat...??? | 19 |
| वानमधील दुर्मिळ पक्षी संपदा | 22 |
| मेळघाट जंगलामध्ये मधुमेह रोगासाठी आढळणारी वनोऔषधी | 24 |
| Promoting Sustainable Lifestyles Among Tribal Community in Melghat Landscape | 26 |
| पाणलोट विकासातून वने व वन्यजीव संवर्धन | 28 |
| थांब माणसा | 31 |
| मेळघाट | 32 |
| मचाणावरील रात्र | 33 |




# Editorial

October 1st to 7th is celebrated as 'Wildlife Week' with great enthusiasm and passion throughout the country. The word “Wildlife” usually refers to plants, fungi, animals, birds and every other organism that grows or lives in the wild and in areas with minimal human intervention. Wildlife Week celebrations throughout the country were first started in the year 1952 with the intention to protect and conserve the wildlife especially the threatened wild species.

Melghat Tiger Reserve, being affluent with all these wildlife assets, has a unique importance in the region. The awning Satpuda ranges make Melghat Tiger Reserve a unique tourist attraction and an exceptional habitat for the wild. This Critical Tiger Habitat boasts of some of the most obscured wildlife that can be found in India. From Flora-to-Fauna, Melghat is still an uncharted landscape and an awaiting adventure.

Encountering over 80 species of mammals, 54 species of Amphibians, 96 species of Fishes and 264 species of Birds, the faunal diversity of Melghat is uncustomary. The floral mélange, with over 772 species is yet another case proving Melghat to be an optimal habitat for the wild.

With all these vast resources to be handled, the Forest Department undertakes continuous painstaking measures to conserve and render these resources safe. The unceasing work by the department complemented by the role of NGO's and commoners underlines the long journey to safeguard the vitality of such bio-diverse areas like Melghat not only for the conservation of floral and faunal resources but also for thye ultimate survival of us humans.

As said by Edward O. Wilson “Each Species is a masterpiece, a creation assembled with extreme care and genius.”

With this message in consideration a strong emphasis should be laid for the conservation of these wild resources to be undertaken not only by the forest department but also by every citizen and group working hand in hand.

**M.S. Reddy**

Additional Principal Chief Conservator of Forest

& Field Director, Melghat Tiger Reserve, Amravati



# Photo Feature



Red Whiskered Bulbul



Vairat Jungle Safari



Tribal Utensils



Chafa *(Plumeria)*



Brown Headed Barbet



Tickell's blue Flycatcher



'Melghat' Confluence of History & Wildlife



Narnala Fort



View of forest at Golden Hour

# Photo Feature



**Sipna River**



**Magical Melghat Summers**



**Sipna River: Kolkas view-point**



**Forest Owlet**



**Magical Meadows of Melghat**



**Where Land meets Sky**



**Malabar pied Hornbill**



**Crested serpent Eagle**



**Family Time**

# Melghat – from the eyes of a Trekker



Melghat holds attractions for everyone – each age group! Jungle Safari, Night Safari, Trekking, Long drives, Waterfalls, Bird-Watching, Adventure games and other activities etc. Even if you are not into any activity – you will still enjoy the lush green forests, mountains, stay at the British era guest houses, newly created resorts – both Govt. and Private. Just sitting by the nearby flowing waters will enthral you. A sociologist will study the tribal life. The biologists may study the flora and fauna along with the medicinal plants. The creative writers will get the long sought after peace of mind to rejuvenate their souls away from the bustling city life. The history lovers will roam the forts like Gawilgad and Narnala.

I do not know exactly as to which abovementioned categories I fit in. But broadly I may describe myself a lifetime trekker and I should limit my descriptions to that. Even as a trekker there are two phases in my life. For the earlier part and even late into adulthood I was not aware of trekking as a systematic activity. Before that I was just aimlessly wandering into the forests of Melghat just as and when the opportunity was there. Unprepared, unguided and unaided. Things changed after I came into contact with professional trekkers - mountain climbers, bird watchers, environmentalists etc. Gradually I changed my attire to suit the environs of forest and mountains. Started carrying the essentials on my back. Got the sane advices from the experienced and the experts. Acquired the required, bare minimum gadgets etc.

The Melghat region is basically a core forest area with protected and prohibited Tiger Projects. The Govt. Forest Department has the main jurisdiction there. Its well trained officials and employees have the unenviable task of protecting the wildlife in inhospitable conditions – facing both the wild animals and the irate tribal population who were displaced from their age-old habitats. The officials are aware of the livelihood problems being faced by the tribals and are making honest efforts to rehabilitate and resettle them. Hitherto, the core jungle areas were strictly prohibited and the general public had no access there. But after sensing the potential of eco-tourism in providing gainful employment for the displaced tribal youth, the initially reluctant forest department started opening up and allowing entry to the tourists on certain terms and condition of not harming the nature.

My first regular trek in Melghat was from **Khatkali to Highest Point**. It was raining on that day. We had to cross several flowing streams on the way with the help of ropes. Initially the track was even but the last 3 kilometers were steep rise. Here we learnt some basics of trekking. Saw the scratch marks on trees made by the sloth bear etc. We returned to Khatkali from the Highest Point in the vehicles by tar road.

Second trek was followed immediately after 15 days. **Gullerghat – Dhargad – Narnala – Shahnoor**. It was around Maha-Shivratri and the forest department had then allowed the pilgrims to visit the Holy Caves at Dhargad. After having Darshan we started climbing up the hills and were walking continuously from 11=00 am upto 9=00 pm. It was under hot sun and there were no water bodies along the major portion of our trek. Climbing up and down the mountains was also hard and dangerous at some places. The sight of CAP like portion of Shadalbuwa Donger, crossing the narrow and dangerous 'Hirkani Marg' for entering the Narnala Fort through its fallen rampart on our way were really fascinating. We soon ran out of drinking water and a few of us faced cramping in calf muscles due to dehydration. Had to quench our thirst with the muddy by really sweet tasting water of 'Sakkar Talav' on Narnala Fort. Nobody fell ill – except those who waited for bottled mineral water. Night trek part from Narnala to Shahnoor village was also thrilling.

Few days after that we attended a full day **'Bird Watching Camp'** at Thakurwadi (An Agricultural Tourist Centre – *Krushi Paryatan Kendra*) at **Popatkhed** near Akot. Enjoyed the fresh village food there.

Soon, we had a chance to visit Khatkali again. But this time as some ladies accompanied us, we restricted our trek to **Khatkali to Madhi Jungle**(*Dense Forest*) only and avoided climbing up steep slopes of Highest point. But again it was raining this time too. I remember to have crossed about 9 water streams 2 times each – making it 18 times. This was the toughest part here. The water coming down from the mountains was extremely muddy and flowing with full force which made it difficult to hold your feet steady. One cannot guess whether you are putting your foot in a deep pit or on a round slippery stone inside water. The fear of water snakes was also there. The water in the first stream which was few inches deep when we started had risen to our waists on our returning time. We crossed the streams with the help of ropes and forming a human chain by holding hands together.

On all the initial events – Mr. Laxmishankar Yadav, an international wrestling Govt. coach from Akola was our guide. Armed with the basic tricks of jungle and mountain trekking - he taught us, I continued my "nature tours" in future with him and also others – in Melghat an elsewhere too. In later days I came into contact with many NGOs like WECS, YHAI(Amravati Unit) and the NGO formed by Ajinky Sanap and Rohit Pundkar which is actively arranging the adventure activities in collaboration with Forest Department at the Tourism Complex at Shahnoor village at the base of Narnala Fort. In the process became friendly with helpful forest officials like Mr. Sunil Wakode, Mr. Deshmukh, Mr. Lambade, Mr. Pradeep Rathod etc. at the Akot Division.

**Dharkhora Waterfall** near Buradghat village on Partwada-Ghatang road is supposed to be the highest waterfall in Melghat. It's a moderate trek of about 5 km. Now the distance is reduced further as the approach road was recently constructed there. It is suitable for family tours. I have visited it 2 times so far.

**Chinchati Waterfall** is also a sight to watch. The distance of trek is not much from the Chinchati Village but it is somewhat difficult as you have to walk through the undulating path of river. It is located near Devgaon where you can reach from Dhamangaon Gadhi. I have gone there only once.

The more difficult ones are the **Kalalkund – Bakadari Waterfalls**. How to reach there? On Dhamangaon Gadhi to Chikhaldara road, 17 km before Chikhaldara – you find a Bus stop of Aadnadi Village. Aadnadi is at a distance of about 5-6 km from here. Park your vehicles at Aadnadi village and (with local guides only) start walking towards Kalalkund. It's a total 14 km (to and fro distance) trek. Upto Kalakund it's a easy to moderate trek. At kalalkund you have to climb up the height with hanging, open - iron stairway tied with steel ropes to nearby hills – without handrails at some places and with a few steps missing – really adventurous. From there you cross the uneven stream and walk through large patches of stones and narrow, slippery pathways to reach Bakadari. I had the opportunity to visit this place 3 times so far – with different groups. This is recommended for the atheletic, strongly built individuals.

If you are still interested in the moderate trek and a safe waterfall visit, I will recommend "**Sulai Waterfall**" near Gullerghat. This is considered to be safest waterfall in Melghat. You can approach there in your own vehicle or in hired gypsies by tar road after crossing Popatkhed near Akot. Or alternatively you can enjoy a trek (*13-14 km app.- To and Fro distance*) in the prohibited Tiger Project area from Shahnoor Tourism Complex to this water fall. *(with due permit and with the help of a guide only)* It's called Chandansawali Phata to Sulainala waterfall Trek. The organizing NGOs and the Forest Department provide help, guidance and all possible protection there. You can find the signs of the wildlife during your walk. Even the normally healthy ladies and girls can undertake this trek. Entering into the water here is permitted, relatively safe and enjoyable. I am normally reluctant to enter into unknown waters and best possibly avoid it. But here I have also done it twice during my visits.

For the religious ones, a visit to **Muktagiri Temple Hills** is a must. It also has a known old **waterfall** site. But, due to the risk of falling stones they do not allow you to go near it. You have to watch it from a distance. It's a beautiful complex of about 52 Nos. old Jain Temples. The vegetarian food available there is tasty. I have visited this place several times since my childhood but still long to go there.

**Dhargad Caves** near Akot and **Salbardi Caves** near Morshi are also for the religious minded ones. Devotees of Lord Shiva rever these places as 'Motha Mahadev'. Dhargad is out of bounds without permission. But at Salbardi, the explorers have recently discovered a few more caves along the bank of the river in the hills. The History lovers may visit them. I have seen three of them near the existing Ashram (*with trek organizer Mr. Manish Dhakulkar*) but I have also heard that there more other caves in the vicinity.

Every year on 30$^{th}$ April or the full moon night of Buddha Pournima, the Forest Department attempts to hold a census of wild animals in the forest. This is recently renamed as "**Nisarg Anubhav**". Temporary open structures of Bamboos and ballies- called '**Machan**' for night long stay are erected on trees near the waterholes in deep forests. On payment of certain fees, the members of the public are allowed to participate in this event. It's a different, adventurous experience to spend the night in the never before seen dark environment in the deep forests totally awake for the full time – listening to the never before heard voices and sound of wild animals and birds watching them silently from the tree top – with a company of just one but knowledgeable tribal forest labourer. If you are lucky, you may have the opportunity to see the King of the Jungle, the Majestic Tiger. But the chances of seeing the sial, barking deer, the sambar, sloth bear, the mighty Gava and various species of birds are more.

Two years ago I participated in one such event in **Tarubanda** block and enjoyed the dangerous thrills in it as the machan allotted to me was very small and old with barely a space to just sit on it, that too uncomfortably on the decayed, uneven base- leaving no option but to remain awake the whole night. The location of this machan was about 22 km away from Tarubanda in deep forest. However, despite my many trekking excursions in Melghat I am yet to see the living and moving tiger, here. I have come across many signs of his existence – his foot prints, excreta and other symptoms. Now-a-days, they are providing the Machan Anubhav on a regular basis at a few tourist complexes in Melghat. You are expected to take many precautions and follow the conditions laid down to protect yourself and also the environment.

The Forest Department, especially the Melghat Tiger Reserve Project wing is having the Tourist complexes at **Shahnoor, Semadoh** etc. with facilities for Stay, Canteen, Recreation, Adventure Games, Day and Night Jungle Safaris etc. In collaboration with NGOs they organize trekking camps, training camps for the nature and wildlife enthusiasts. Now-a-days they have started online reservations in the **British Era guest houses** at remote places like **Dhakna, Rangubeli, Chourakund** etc.

The Rest House at **Kolkhas** is located on the high bank of a river and provides a beautiful sight. I have just visited the spot but not stayed there. But at **Semadoh Sankul,** I had the opportunity to stay for 3 days during the "Story Writing Work-Shop" organized by Marathi Language Department of Sant Gadge Baba Amravati University. We enjoyed our stay there near the flowing river and also participated in the Jungle Safari in Gypsies. I have also visited the **Jawaharkund Waterfall** near Semadoh in one of my travels in Melghat.

It is recently reported that someone has discovered 5 to 7 new waterfalls near Dharni. I have not yet gone there but hope that someone organizes a tour of that place.

In one my of other visits to Semadoh I experienced what the fury of nature means. It was raining heavily. The thunder and lightening started. We got down from our cars and took shelter in a tin shed canteen on road. Suddenly lightening struck at a distance of 10 to 15 feet from where we were standing. Our cars were parked there. For the first time in my life, I heard, witnessed and felt the heavy electric charge, so near. For a few seconds I felt that at least one or two cars must have suffered damages. Luckily everything was safe.

I have personally stayed at the **Rangubeli Guest House** during my participation in the YHAI trek. Then, I also had the opportunity to meet renowned social worker couple Dr. Ravindra Kolhe and Dr. Smita Kolhe at Bairagad. At that time I was attending a National Trekking Camp of YHAI at Kolupur near Dharni. I returned from that camp earlier than the schedule due my other assignments.

Two years ago, I attended a two day camp at Shahnoor, with my family - which included a morning trek in the Tiger Project area, a long safari to Bori which lasted many hours and we could enjoy the benefits of both the day and night safari, a visit to Historic Narnala Fort, other adventure games etc. It was successfully organized by the forest department and NGO run by Ajinkya Sanap and Rohit Pundkar.

The same team organized last year a heavy two day 42 km trek in the Tiger Project. Luckily I could attend it. It covered **Shahnoor – Amona –Paldhari – Dhargad – Shadalbuwa Donger – Gullerghat Camp(***We stayed there at night***)- Narnala Fort – Shahnoor**. On the first day, we had lost our way as even the local guide could not find the pathways as the tall grass had grown over it. Since nobody is allowed inside this zone, the old pathways are gradually disappearing. Mr. Sunil Wakode, RFO had become anxious and sent out his team to search for us. Somehow, we traced back the desired route in the dark through the meadows where the grass was taller than us. Many of us were experienced trekkers and had strong torches with them for light.

Next morning, before starting the further trek, the trekkers from Mumbai went out early, carrying heavy cameras on their shoulders, in the nearby meadows in search of **Forest Owlet**. Mr. Sunil Wakode, RFO used some trick to call the bird and the Mumbaikars were extremely happy to see the creature. Then the regular trek started. We entered the Narnala Fort by climbing up more than 500 meters height on a steep slope through a rear gate of the fort. At some points on the heights, the route was very narrow, difficult and risky. Rohit Pundkar and others took positions to protect me from falling down and also pushed me up to reach the gate. Everyone was considerate for my age and was supportive. The moment I reached the entry gate of the fort after completing the strenuous and difficult route, almost all of the participants who had reached there much earlier; clapped in appreciation for my efforts and success.

Some of the participants who were new trekkers had found it too difficult to walk continuously in forest – ascending and descending the slopes, decided that enough was enough. They managed to call their cars on Narnala fort and vanished from there along with their friends. Hardy 8 to 9 participants were left with Rohit in the last leg of the trek from Narnala to Shahnoor.

Among other treks I have undertaken so far in Melghat, I can mention –

1. **Gawilgad Fort Trek** (*About 12 Km – Difficulty level:Moderate to Heavy*) which I undertook twice – first with Dr. Jayant Wadatkar (WECS) and second time with Mr. Gaurav Kadu. In fact I have visited Chikhaldara, the famous hill station of Vidarbha where this fort is situated, several times since my childhood. I had also seen the fort many times before this – but not through the eyes of a trekker or a History researcher like Dr. Jayant Wadatkar. By the way, you can also visit Bhim Kund, Panchabol Dari, Devi Point, Hariken Point, Vairat, the Forest Museum, Yoga Centre etc. at Chikhaldara. Chikhaldara Darshan buses are also available. Many private hotels are also there.

2. **Ghatang to Kokru Trek** (*about 11 Km ascending, Difficulty Level:Moderate*), Myself and Prof. Umesh Kale had independently organized this trek by making local enquires. The villagers did not accompany us even after we promised to pay them the guide charges. It was later learnt that there was a risk of meeting the sloth bear along the tract and it was foolish of us to enter this area of forest on our own with only 2 persons. Fortunately, the YHAI people who had organized the trek on the same route on that day but could not accommodate us met us in the later portion of the trek as some of them were stranded en-route as one of their lady participants suffered pain in the muscles and was unable to walk further. Among other efforts to make her walk, one from the organizers sensed that she must be suffering from sodium level depletion. Fortunately I was carrying salt with me. She was given some salty water and like a miracle she was revived within minutes. The first aid was successful. I doubt whether this remedy would have worked with a blood pressure patient whom the doctors advice to avoid excessive salt. Anyway, proper diagnosis of the problem is the key to solving it. Those who face the ground situations, learn to understand and master them quickly.

3. **Musondi to Semadoh Trek** (*around 10 km descending, Difficulty Level:Moderate*) with YHAI. Frankly I found this trek more strenuous and tiresome as a different set of leg muscles is stressed while coming down the slopes. After googling my queries I found that the level difference was about 550 meters. That means we came down a height of about 175 floors of a building. Not an easy task. Adv. Atul Bharadwaj, President of Amravati Unit of YHAI taught us some tricks to lessen the strain on legs. We also used the hiking poles to take support.

Those who are interested in trekking in Melghat region, may search the web for information. There are many more trekking routes available. For stay you can book the Forest and M.T.D.C. resorts online including the heritage British Era Guest Houses. Hired Gypsies and other vehicles are available. Forest department website provides every possible information of interest. They have also produced a nice Coffee Table Book – "MAGICAL MELGHAT, A Montage of Landscapes, Jungles and People" worth reading. You can also see my Facebook Albums and posts for more information.

Till today, despite my several visits to the deep forests in Melghat and elsewhere in India, I have to confess that I can not confidently name any bird, tree or animal in the forest. But at least my trekking excursions have made me aware of their existence around me and in my life. I can not explain in words what this realisation has done to me and how it has changed my life for the better. Feeling of being one with nature - That is enough for me at the age of 57. I should have started earlier.

**Satej M. Keche**
Mobile No. 9423125201



# "निसर्ग अनुभव"



मेळघाटातील शालेय आदिवासी विद्यार्थ्यांकरिता "निसर्ग अनुभव" हा पर्यावरण शिक्षण उपक्रम दिनांक ४ डिसेंबर २०१८ रोजी श्री.एम.एस. रेड्डी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती. यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यास सुरुवात झाली, व यामध्ये आता पर्यंत २५ आश्रम शाळा व ९२० विद्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांचा जंगल संवर्धनात तसेच वन्यजीव संरक्षणात सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने या उपक्रमाची संरचना आखण्यात आली, ज्यामध्ये विविध विषयावर तज्ञांचे मार्गदर्शन, प्रत्येक आश्रम शाळेला ३ पुस्तकांची भेट, नेचर गेम, जंगल सफारी, नेचर ट्रेल, किल्लेभ्रमंती, निसर्गभ्रमंती या सर्व गोष्टीचा अंतर्भाव होतो. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये जंगल व प्राण्यांविषयी प्रेम, आपुलकी व आदर निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातुन या उपक्रमाच्या माध्यमातून प्रेरित केले जाते.

मेळघाटात हा उपक्रम राबविताना अनुभव हा अतिशय अविस्मरणीय व आनंददायी असाच होता. शाळेचा, शिक्षकांचा, व विद्यार्थ्यांचा मिळणारा प्रतिसाद हा प्रशंसनीय होता. विद्यार्थ्यांना हि सहल वाटत होती पण माझ्यासाठी मात्र निसर्ग प्रेमाचे बीज हसत-खेळत त्यांच्या मनामध्ये रुजविण्याची सुवर्णसंधीच होती. जे यापूर्वी विद्यार्थ्यांनी कधीहि बघितलेच नव्हते ते किल्ले पाहताना व त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेतानाचा त्यांचा आनंद काही अनोखाच होता, परत जाताना विद्यार्थ्यांची जंगल वाचविण्याच्या नवनवीन युक्त्या ऐकुण व त्यांचे हसरे चेहरे पाहून मला वेगळेच समाधान देऊन जात होते.

तसेच नुकताच नव्याने "कौन बनेगा मेळघाट का राजदूत" हा विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढविणारा उपक्रम चालू करण्यात आला आहे. या सर्व उपक्रमांमुळे भविष्यात चांगले "निसर्ग रक्षक नागरिक" तयार होतील व जंगलाचे संरक्षण करतील यात शंकाच नाही.

**अनुजा गावंडे**
पर्यावरण संशोधक
मेळघाट व्याघ्र प्रकल्प



विदयार्थ्यांना जादुई मेळघाट विषयी मार्गदर्शन करतांना



निसर्ग खेळांमधुन अन्नसाखळीचे महत्व



वन संरक्षण कुटीवर जंगल वाचविण्यासाठी प्रश्नोत्तरे व नविन युक्त्या जाणुन घेतांना



नरनाळा किल्याची ऐतिहासिक पार्श्वभुमी सांगतांना



विदयार्थ्यांना जंगल सफारीला घेवुन जातांना



कौन बनेगा मेळघाट का राजदुत कार्यक्रम

# धगधगते जंगल आणि लोकसहभागाची गरज

दिनांक ९/४/२०१८ वेळ सकाळी १० वाजताची, एक चिंगारी पेटली आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पामधील मिनी मेट्रो व्हिलेज अशी ओळख असलेल्या सेमाडोह गावातील ३७ ते ४० घरांची बघता-बघता राख रांगोळी झाली. आग वाढत आहे आणि विझवायला पाणी नाही म्हणून घरे तोडावी लागली आणि शेवटी परतवाडा, चिखलदरा येथून अग्निशामक दलाने दुपार नंतर या आगी वर नियंत्रण मिळवले. पण जो काही तांडव सकाळपासून दुपारपर्यंत घडला त्यामध्ये गरीब आदिवासिंचे आर्थिक नुकसान तर झालेच पण मानसिक ताण-तणावाचे काय? आग ती आग आहे जी एक वेळस गरज आहे दुसऱ्याच क्षणी विध्वंस आहे. याच आगीबद्दल म्हणजे धगधगत्या वनव्याबद्दल आपण बोलूया.

उन्हाळा लागला की एक ज्वलंत प्रश्न निसर्गप्रेमींना, वन्यजीव अभ्यासकांना आणि वनविभागासमोर आ वासून उभा असतो. तो म्हणजे या वर्षी वणव्याचे भीषण रूप कसे असेल? त्याला रोखायचे कसे? त्यासाठी काय उपाययोजना कराव्यात? स्थानिकांचा सहभाग मिळेले कि नाही? हे सर्व प्रश्न पडत राहतात आणि जंगले जळायला लागतात. मग ते राखीव जंगल असो किवा संरक्षित, झुडूपी असेल किवा माळरान. जंगल जळणार म्हणजे जळणार आणि या नैसर्गिक राष्ट्रीय संपत्तीचे अतोनात नुकसान होणार. उभी असलेली झाडे कोसळणार, पावसाचे पाणी जमिनीत मुरवणारे गवत जळून नष्ट होणार, पक्ष्यांची, प्राण्यांची पिल्ले भाजून खाक होणार, प्राण्यांची पळापळ होणार जीवाच्या आकंताने. नदी-नाले ओस पडणार, समृद्ध जंगलांचे डोंगर उघडे पडणार. दिसणार फक्त आणि फक्त वणव्याने जळलेली काळी झाल्लर पसरलेले ओसाड-उनाड डोंगर, जंगल, जळलेल्या प्राण्यांची, पक्ष्यांची राख, ती सुद्धा त्या काळ्या भाजलेल्या वसुंधरेत. हे सर्व घडतय कुठे तर जिथे निसर्गाला देवाचे रूप, सर्वस्व मानले जाते तिथे, पूर्वजांनी, संतानी आणि संविधानानी जंगलाचे महत्व पिढ्यां न पिढ्या समजून सागितले पण तरी असं का होतोय? हा प्रश्नच आहे. याच प्रश्नाचा शोध आपण घेण्याचा प्रयत्न करूया.

हा देश आपला, हे राज्य आपले ही जंगले आपली. जी आपल्याला अन्न, पाणी, शुध्द हवा, औषधी, लाकूडफाटा, वन-उपज, शेतीचे, घर बांधायची साधने, जनावरांचा चारा, वन्य-जीवांचे निवास्थान आहे. हे सर्व म्हणजे **जीवन** देते. जीवनाचा अर्थच होतो वनावर आधारित जीवन. तरी का जळतात ही वने आणि याला जवाबदार कोण? जंगल आपली संपत्ती तर याच जंगलांचे वाळवंटीकरण, विद्रूपिकरण का बरे होते?

खर तर हे सर्व गुंतागुंतीचे आहे आणि आप-आपल्या स्वार्थासाठी होत आहे. म्हणायला भारत माझा देश आहे, माझ्या देशावर माझे प्रेम आहे पण मुळात आम्ही सर्व आप-आपल्या स्वार्थाने झपाटलेलो आहोत. स्थानिकांना वाटते कि या वनावरून आमची मालकी हिरावून आमचे अधिकार हिरवून घेतले. वनविभागातील काही कर्मचारी-अधिकारी वर्गाला वाटते की शासनाने आम्हाला जंगल संवर्धनासाठी नियुक्त केले आहे तर ते आमच्याच मालकीचे आहे. दिलेल्या अधिकाराने ते स्थानिकांना साहेब गिरीने वागवतांना दिसतात. हे स्थानिकांना कळत नाही असे नाही. काही स्थानिकांचे ही स्वार्थ आहे. ज्यांना अवैधरित्या गुरे चरायला पाहिजे, चोरून लपून लाकूड फाटा आणायला हवाय, काही प्रमाणात शिकार करायला पाहिजे, तेंदूपाने तोडायला हवी, वन्यजीवाकडून शेतीचे किवा पाळीव गुरांचे नुकसान झाले तर त्याचा ही राग जंगलावर, इतर ही सूक्ष्म कारणे आहेत. वन कर्मचाराने विरोध केला किवा त्यांना पकडले तर मग काढा त्यांचा राग जंगलावर, पेटवा वणवा. निवडक स्थानिकांना असे वाटते जसे त्यांनी वनवा लावून खूप मोठ समाजकार्य केले आहे आणि वन-विभागाला सजा आणि जेरीस आणलयं अशी त्याची विकृतीची

मानसिकता. वणव्याने आपण आपलच घर पेटवतोय हे त्यांना कळत कस नसाव? वनविभाग व स्थानिक याच्यातील दरीने आम्ही आमचीच वने राख होतांना बघतोय. नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्र रोज जळतय ते तेंदू व्यापाऱ्याच्या हव्यासापोटी आणि त्यांना साथ देतात ते स्थानिकच. उन्हाळा सुरु झाल्यापासून आज लिखाण करे पर्यत कोर क्षेत्रामध्ये २० जवळ वणव्याच्या घटना तर बफर व कॉरिडोर क्षेत्रामध्ये (वाघ भ्रमण मार्ग) ७५-८० घटना घडल्या असून साधारणता १० हजार हेक्टर जंगल जळून खाक झाले आहे असे मत सेवा संस्था, गोंदियाचे सावन बाहेकर यांच्या रोजच्या अभ्यासातून व्यक्त झाले आहे. दरवर्षी कमी-अधिक प्रमाणात विदर्भाचे वाघाचे अधिवास, प्रजनन केंद्र म्हणून ओळख असलेल्या मेळघाट, पेंच, ताडोबा, बोर व्याघ्र प्रकल्पाची कथा काही वेगळी नाही. बाहेरील गुरेधारक लोक स्थानिकांकडे गुरे चारण्यास पाठवतात व जंगल जाळल्याने नवीन गवत जोमाने वाढते या मानसिकतेपोटी त्यांना जंगल जाळण्यास उदयूक्त करतात आणि स्थानिक त्यांच्या प्रलोभनास बळी पडून वणवा लावतात. हे एक अत्यंत महत्वाचे कारण सगळीकडे बघायला मिळते. या व्यतिरिक्त काही प्रमाणात वणव्यांची कारणे बदलतील पण सरते शेवटी आपलेच भविष्य आम्ही पेटवतोय हे मात्र नक्की. गेल्या ५ वर्षापासून या सर्व प्रकल्प परिसरात मी जातोय; वनविभाग विविध योजनेमार्फत स्थानिकांचा विकास करण्याचा प्रयत्न करत आहेत तरी दरवर्षी वनवे लागतातच. विविध योजनेमार्फत स्थानिकांना अनेक गोष्टी पुरवल्या जातात तरी कुणी या योजनेपासून वंचित राहिले तर ते या वनाला जास्त धोकादायक असतात. वन कर्मचारी यांच्यावरील राग हे दुसरे महत्वाचे कारण आणि तिसरे म्हणजे पारंपारिक मानसिकता. या वर्षी मेळघाटचे जंगल वणव्याच्या भडक्याने जळत आहे. २०१४-१५ मध्ये पेंचला असतांनां पेंच सरोवरातील अवैधरीत्या मासेमारी करणाऱ्या लोकांवरती वन विभागाने कायद्या अंतर्गत कारवाही केली आणि त्यांचा राग, बदला म्हणून त्यांनी सतत वनवे लावून घेतला. अस म्हणायला हरकत नाही. म्हणजे एका भागात वनवा लागल्यावर वन कर्मचारी तो विझवायला जातो तर माहिती कळते की दुसऱ्या भागात वनवा सुरु झाला आहे. तिकडे जात नाही तर नंतर तिसरीकडे वणवा पेटला आहे. २०१४-१५ मधील बोर मधील घटना अशीच काहीशी आहे, अवैध गुरेचराई करण्यावरती कारवाही केली तर त्याचे प्रतीउत्तर वणव्याच्या रूपाने बघायला मिळाले. हे सर्व ठरवून व मुद्दाम द्वेषाने केलेल्या घडामोडी असतात. सर्वच ठिकाणी वणव्याची धग आहे असे नाही काही वन क्षेत्रामध्ये तुरळक वनवे लागले आहेत पण स्थानिकांच्या पुढाकाराने व वन विभागाच्या सक्रीय कार्याने वणव्याला आळा बसलाय. हे घडलंय जिथे स्थानिकांशी नियमित सवांद होतो, त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जातात, त्याचा सन्मान व आपुलकीने वागणूक दिली जाते, त्यांच्या उपजीवेकेसाठी प्रयत्न केले जातात, त्यांना समजून सागण्यात येते की ही जंगले आपली आहेत, आपल्या पिढीसाठी आहे, अश्या ठिकाणी वणव्याचे प्रमाण अत्यंत अल्प किवा नाहीच्या बरोबर आहे. ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील मोहर्ली बफर क्षेत्रामध्ये २०१५ ते २०१७ च्या कालावधीत तिथे केलेल्या योग्य नियोजनामुळे, व्यवस्थापणामुळे व लोकसहभागामुळे. वन विभागाने केवळ वनाचे संरक्षण केले नाही तर लोंकाच्या उपजीविकेसाठी केलेले कार्य, पर्यावरण शिक्षण, वनाचे महत्व नियमित पटवून देणे, यामध्ये अनेक गोष्टी कार्यरत आहे. एक तर स्वता अधिकारी जमिनीवर बसून स्थानिकांशी आपुलकीने बोलणे, त्यांचे प्रश्न समजून घेणे, स्थानिक युवकांची फळी तयार करणे त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे, वन कर्मचारी वर्गाला एकत्रित बांधून ठेवणे, सर्वांची काळजी घेणे आणि स्वत: प्रत्येक मोहिमेमध्ये पुढाकार घेणे व नेहमी तत्पर असणे. यामुळे मोहर्ली बफर क्षेत्रफळ सुरक्षित व अबाधीत आहे. मी ताडोबा-व्याघ्र प्रकल्पामध्ये नियमित काम करतो २०१७ च्या एप्रिल महिन्यात एका संरक्षित वन परीक्षेत्रारात वणव्याने हजारो हेक्टर वन जळतांना मी पाहिलयं आहे

पण तिथेच मोहर्ली बफर क्षेत्रामध्ये जिथे आजूबाजूला १५ पेक्षा अधिक गावे लागून आहे अशा ठिकाणी वनवा लागलेले मी बघीतला नाही हे घडलय कर्तव्यदक्ष व वनाची आवड असणाऱ्या वन परिक्षेत्र अधिकारी श्री. शिंदे सर व त्यांचा टीम वर्कमुळे. नवेगाव-राष्ट्रीय उद्यान परिसरामध्ये सुद्धा या वर्षी वणव्याची घटना अत्यंत कमी आहे कारण गेल्या २ ते ३ वर्षामध्ये स्थानिकांशी वन विभागाने जुळवून घेतले, त्यांच्या उपजीविका व जन जागृती या कार्यामुळे.

आता वनवा हे काही वन विभाग व गावकरी याच्या पुरता मर्यदित विषय नाही तर या वनातून मिळणाऱ्या पाण्यावर जगणाऱ्या शहरातील लोकांचा सुद्धा आहे. आता शहरातील लोंकांचे काय तर या सर्व गोष्टीशी त्यांना फारस काही घेणे देणे नाही कारण त्यांना पाणी हे धरणातून त्यांचा घरापर्यत नाही बेडरूम, स्वयंपाक घरापर्यत सहज पोहचते. बटन चालू केले की पाणी येते व तेही मुबलक प्रमाणात. हवा मिळते पण ती कुठून आपल्या पर्यत पोहचते याचे सोयरसुतक नाही. कारण त्यांना माहितच नाही जंगल आहे म्हणून पाणी आहे. जंगल आहे म्हणून शुद्ध हवा आहे. जंगल आहे म्हणून आपले अस्तित्व आहे. हे AC, कुलर, कलर T.V. पाहणाऱ्यांना आणि पिझ्झा खाणाऱ्यांना कस कळणार. पण आज हा विषय यांनी सुद्धा समजून घेणे गरजेचे आहे नाहीतर पाणी, प्राणवायू, अन्न नसेल तर. तर ते समजून घेऊ या. वंदे मातरम सुजलाम सुफलाम मलयज शीतलाम असणार आमच राष्ट्रीय गान. या ओळीनुसार आपला देश सुजलाम सुफलाम रहायला आहे का ? दरवर्षी हजारो हेक्टर जंगल जळत आहे. जसे-जसे उन्हाचा तडका वाढतो तसे तसे जंगले दाहकतात, सागायचे झाले तर फेब्रुवारी ते मार्च या दोनच महिन्यात १५०० घटनांची नोंद झाली आहे तर संपूर्ण देशात २२ हजार १२८ वणव्याच्या घटनांची नोंद आहे आणि यावर्षी वणव्याचे प्रमाण मागच्या वर्षीच्या तुलनेत वाढले आहे हे सर्व फोरेस्ट सर्वे ऑफ इडिया याच्या अभ्यासानुसार आहे. हे सर्व मानव निर्मित आहे. २०१७ च्या तुलनेत या वर्षी ४० टक्यापेक्षा अधिक आगीच्या घटनांची नोंद आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात वणव्याच्या ११ टक्के घटनाची नोंद आहे. (दैनिक लोकसता).ही झाली आकडेवारी. यापलीकडे सुद्धा वणवा पेटतोय. अस सतत घडत राहिले तर उरली-सुरली चागली असलेली ५ ते ६ टक्के वने जळून खाक होतील. मग पाण्याचे प्रश्न ऐरणीवर येतील, वातावरणातील बदल हे एक मोठ आव्हान आपल्यापुढे उभे असताना आपणच आपल्या भविष्याची नाळ तोडतोय. तीनशे पेक्षा जास्त नद्या या जंगलातून उगम पावतात उद्या ही जंगले नसतील तर विचार करा. जंगल नाही तर पाणी नाही, पाणी नाही तर शेती नाही शेती नाही तर अन्न नाही तर आपले अस्तित्व नाही. तेव्हा स्थानिकांच्या मनातील वनवा कमी केला की जंगलात वनवे लागणार नाही. त्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा. वेळात-वेळ काढून आपण त्यांच्या जवळ पोहचायला हवे. त्यांना हा विषय कळतो तरी आपली नैतिक जवाबदारी समजून परत-परत त्यांना समजावून सागणे गरजेचे आहे कारण आपण भारतीय आहोत आणि ही वने आपल्या जीवनाचा आधार आहे नाहीतर आपले अस्तित्व नसणार. मग आपण कोणीही असा विद्यार्थी, शिक्षक, शासकीय, अशासकीय कर्मचारी सर्वांनी मिळून आपण आपल्या वनाचे संरक्षण संवर्धन करण्यात सहभागी होऊ या.

प्रफुल्ल उदयन सावरकर
उपजीविका तज्ञ
मेळघाट व्याघ्र प्रकल्प
८९२८९२९९२०

# मेळघाटातील महिलांना मिळतोय रोजगार




मेळघाट व्याघ्र प्रकल्पात तर्फे मेळघाटातील महिला करीता शिलाई मशिन प्रशिक्षण केंद्राची उभारणी करण्यात आलेली असुन यामध्ये सेमाडोह, हरिसाल, शाहापूर, (चिखलदरा), आमझरी, शाहानूर, वसाली, दहिखेड फुटकेर, वाघा (कासमार), बोथा व कोईलारी अश्या 10 ठिकाणी शिलाई मशिन प्रशिक्षण केंद्राची उभारणी मेळघाट व्याघ्र प्रकल्पातर्फे करण्यात आली. यामागे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचा उद्देश असा होता कि, आदिवासी महिलांन मध्ये कौशल्य निर्माण होऊन त्यामधून त्यांना रोजगार मिळावा म्हणून त्यांना 500 मीटर कापड व प्रत्येक सेंटरला 10 ते 20 शिलाई मशिन देऊन त्यांना कापडी पिशवी शिवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्याच बरोबर ड्रेसकोट व जॅकेट यांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये महिलांना प्लास्टिक बंदीचा फायदा झाला कि, त्या कापडी पिशव्या शिवायला लागल्या परंतु त्यांना मार्केटिंगची समस्या त्यांच्या समोर उभ्या राहिल्या त्यावर मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील मेळघाट टिम त्यांना मार्केटिंग करीता मदत करू लागले. यामध्ये काही वन्यजीव प्रेमी संस्थांनी समोर येवुन त्यांना मार्केटिंग करीता मदत केली आहे. मेळघाट टिम कापडी पिशव्याची मार्केटिग करीत आहे. यामधून सेमाडोह सेंटर ने 7444 पिशव्या विकल्या असुन त्यामधून त्यांना 58,346 रू. मिळालेले आहे. व तसेच नारी शक्ती महिला गट हरिसाल ने आतापर्यंत 18,940 पिशव्या विकल्या असून त्यांना त्यामधून त्यांना 2,17,919 रूपये मिळाले आहे. त्यांना सरासरी फायदा 75,760 रूपये झाला आहे. अश्या प्रकारे शाहानुर येथील महिला गटानी 470 पिशव्या विकुन 4,700 रू. मिळविले. कासमार येथील महिला गटानी 700 पिशव्या विकुन 7,000 रू. मिळविले व कोईलारी येथील महिला गटांनी 2,800 पिशव्या विकल्या असुन त्यातून त्यांना 19,000 रूपये मिळाले आहे. व वसाली येथील महिला गटांनी 550 पिशव्या विकल्या असून त्यांना 4,950 रू. त्यांनी कमविले आहे. व शाहापूर (चिखलदरा) येथील महिला गटांनी 1,878 रू. पिशव्या विकून 14,832 रूपये मिळविले आहे. व आमझरी महिला गटाचा आपल्या पिशव्याची विक्री सुरू आहे. त्यांना या प्रकल्पापासुन रोजगार उपलब्ध होत आहे.

अश्या प्रकारे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने मेळघाटातील आदिवासी महिलांना रोजगार मिळण्यास मदत होत आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने सुरू केलेल्या महिला सशक्तीकरण प्रकल्पापासुन महिलांना मध्ये कौशल्य निर्माण होवून महिलांना फायदा होत आहे. तसेच एका केंद्रावर 10 ते 15 मशिन देऊन तेथे 20 महिलाचा एक गट निमार्ण झाला आहे. व हा गट स्वतः आपले आर्थिक व्यवहार रजिस्टर स्वतः सांभाळत आहे. यामधून मेळघाटातील 200 ते 250 महिलांना रोजगार मिळून त्यांच्यामध्ये कौशल्य निर्माण झाले आहे.

महिला सशक्तीकरण मध्ये अनेक प्रशिक्षणे मेळघाट टिम राबविण्याचे प्रयत्न करीत आहे. या महिला सशक्तीकरण प्रकल्पामधील कापडी पिशव्याची विकण्यासाठी दररोज अमरावती शहरात मेळघाट टिम तर्फे पिशव्याचे विक्री स्टॉल लावण्यात येतात तसेच दुकाने, मॉल, हॉटेल्स यामध्ये पिशव्याची मार्केटिंग करण्याचा प्रयत्न मेळघाट टिम करीत आहे. शहरातील काही हॉटेल्स व दुकांनाने आपल्या नियमित ऑर्डर देणे सुरू केले आहे.

राम ध. उमेकर
सोशल वेलफेअर ऑफिसर
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती



सेमाडोह येथील शिलाई मशीन केंद्राचे उद्घाटन



चिखलदरा, शहापूर येथील शिलाई मशीन केंद्राचे उद्घाटन करतांना मा. मंत्री साहेब



पिशवी चे मार्केटिंग आणि विक्री करतांना मेळघाट टीम




वेगवेगळया मापाच्या पिशव्या



शिलाई मशीन प्रशिक्षण देतांना प्रशिक्षक



शहानुर येथील शिलाई मशीन उद्योग केंद्र

# Wildlife, Culture, Tribes & Nature Ecstasy

What if all these exist at a same place? Yes, they do! Melghat, located in our Hometown, Amravati, Maharashtra, which is a Tiger reserve Wildlife sanctuary.

Melghat tiger reserve has been an evergreen thrill for the past 52 years. It is one of the nine Tiger Reserves to be declared first in 1973-74 under the Project Tiger.

These South western Satpura ranges shelters numerous wild species including Bengal Tiger Sloth bear, Indian Jackal Barking Deers, Nilgai, Rhesus Monkey, Flying Squirrel, Porcupine, etc.

Melghat is inhabited by Tribes such as Korku, Gond, Nihal, Balai, Gaolon, Gawali, Halbi, Wanjari, etc.

Melghat means 'Meeting of the ghats'...

To be precise it is a steep tract of unending hills and ravines...

Melghat is a gem for the Amravatians being a Tourist place for the Spectators of Tiger and to enjoy nature in it's natural beauty... Melghat has been a Tourist attraction and A Chai at Chikhaldara followed by a walk In the Botanical Garden, A Horse Ride, Travelling from One Point to the other - Bhimkund, Devi point, Panchbol, Sunset Point, forts such as Gawilgarh and Narnala, Enjoying by the River at Semadoh are some of the basic things for the tourists.

Although Melghat Tiger Reserve is an Ideal Heavenly Destination and offers an Evergreen opportunity for the Amateur Nature Photographers,trekkers and Wildlife Buffs.

Being An Amravatian, I had begun Exploring Melghat at the age of 7 via trekking alongside Group of explorers and wildlife enthusiasts...

Since then, I found myself related much more to the Wilderness of the Melghat... Melghat invoke my inquisitive mindset by it's cultures, tribes and Wild species.

Melghat has a good population of critically endangered species like Forest Owlet.

Anyone who experiences the marching amidst the Jungle, hiking higher in the hilly areas of Melghat could have a Best form of Adventure even as a beginner.

Melghat tiger reserve has given me more Wildlife Experiences and helped me bond with nature more closely.

As for the students, Melghat tiger reserve gives the opportunity to study the Wild botanical and zoological species, of course with no harm through it's diversity.

NGOs like WECS and Career oriented courses like Wildlife Photography and Ecotourism which originate in Amravati, Maharashtra encourage ecotourism among the youth to spread awareness about the Wildlife. These NGOs also conduct various cleanliness drives on the forts of Melghat Tiger Reserve.

Career oriented courses help students to Experience River crossing and Rappelling in Melghat safely even for a Beginner. Coordinators of such Courses help people to inculcate environmental literacy and Ecotourism in their Minds while in Melghat.

Trekking companies carried out At Melghat also develop a sense of freedom and enjoyment for the People and help nature enthusiasts to explore jungles and Rivers in buffer zone areas of Melghat.

Spotting the Pugmarks and Scathes of Tigers and sloth bears, scratches of Leopards on the bark of trees to mark their territory, Hooves of the Sambars, Bird Calls for birding, Porcupine Quills, Molted Snake skin, Chrysalis Of Butterflies are the Little perks of Travelling amidst the jungle of Melghat I Love.

**Rakshita Ukesh**
Amravati

## मेळघाटातील जीवनदायी नद्या



मानवी जीवनासाठी जंगलांचे अन त्यातील वन्यप्राणी यांचे महत्व नेमके काय आहे ? जंगले आपल्याला प्राणवायू देतात. वन्यप्राण्यांना सांभाळतात, आणखी काय देतात ? सातपुड्यातील जंगलांचे महत्व मेळघाटातील जंगलांचे महत्व फक्त वाघांना सांभाळणे इतकेच आहे का ? नक्कीच नाही सातपुडा पर्वत रांगेतील मेळघाटचे जंगल पूर्व विदर्भातील अनेक जिल्ह्यांतील शेती माणूस अन पशु पक्ष्यांना पाणी पुरवते, इतकेच काय तर खानदेशातील मोठ्या प्रदेशातील बागायती शेतीसाठी मेळघाटातील पाण्याचा मोठा सहभाग आहे. मेळघाटात जंगल वाचले आहे ते वन व वन्यजीव कायद्यामुळे, आणि म्हणूनच येथून उगम पावणाऱ्या नद्या अजूनही पाणी पुरवत आहेत एका मोठ्या प्रदेशातील जनसंख्येला. ज्या भागतील जंगले संपलीत तेथील नद्या नाले, ओस पडत आहेत अन त्या भागातील सपाटीवर कधी कधी दुष्काळ सदृश स्थिती निर्माण होत आहे हे अलीकडे आपण सर्वच अनुभवतो आहे. म्हणूनच मेळघाटच्या जंगलाचे महत्व आपल्या भागासाठी महत्वपूर्ण आहे.

असं म्हणतात कि "जंगल नदीकी मां है". सर्वच नदी नाल्यांचे उगम जंगलातून व डोंगररांगातून होत असतात. हिमालयातील नद्या सोडल्या तर सर्वच नद्यांच्या पाण्याचे स्त्रोत हे पावसाचे पाणी असले तरी नदी नाल्यांना ते पाणी वर्षभर हळूहळू पुरविण्याचे काम करीत असते ते जंगल. पावसाळ्यात धोधो कोसळणारा पाऊस सपाट उघड्या प्रदेशातून व बोडक्या टेकड्यांवरून लगेच वाहून जातो मात्र जंगलामध्ये हाच पाऊस जंगलाच्या छत्रीवर म्हणजेच झाडांच्या पर्णसंभारावर अलगद झेलल्या जातो, व हळूहळू खाली येत जमिनीवर त्याचे सिंचन होतं. जमिनीवरील वाळक्या पानांच्या थरामधून मग तो जमिनीत झिरपत जातो. जमिनीचे पोट भरले की तोच पाऊस मग जिथून जागा मिळेल तेथून झिरपत झिरपत ओहळ बनून बाहेर पडते, पुढे त्याचा नाला अन अनेक नाले मिळून नदीमध्ये रुपांतरीत होऊन तो प्रवाह कधी उंच कड्यावरून कोसळतो तेव्हा धबधबा होतो तर संथ वाहत जाणारी नदी पुढे समस्त वन्यजीव अन मानवाची तहान भागवत पुढे वाहत राहते, भूभाग संपेपर्यंत, समुद्र येईस्तो.

नदीच्या जन्माचा हा चित्रपट अन त्यातील एकेक पात्र मी बघितलेत ते मेळघाटच्या जंगलात. गेल्या अनेक वर्षापासून वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळ्या ऋतूतील मेळघाट जेव्हा पायी तुडविला तेव्हा मेळघाटातील जीवनदायिनी असलेल्या ह्या नद्यांचे प्रत्येक ऋतूत, वेगवेगळ्या जीवांसाठी, वेगवेगळ्या कारणांसाठी असलेले महत्व मी जवळून बघितले. अर्थात मेळघाटात जे आहे तेच सर्वसाधारण सर्व जंगलात असते, मात्र येथील अनेक नाल्यांचे उगम, खळखळत्या नाल्यांचे, ओहोळांचे अन नद्यांचे संगम, संगमानंतर मोठं रूप घेऊन तिच्या प्रवाहात आलेली शांतता व गंभीरता, कधी अवखळ रूप धारण करीत कड्यांवरून कोसळणारे धबधब्याचे रूप तर कधीकधी बेभरवशाचे घातक तर कधी रौद्र रूप मी वर्षानुवर्षे अनुभवले. नुसते प्रवाहांचे रूपच नाही तर या प्रवाहा सोबत निर्माण झालेली संस्कृती, त्या भोवताल वसलेली गावं, गावातील माणूस व जनावरांचा अन जंगलातील वन्यप्राण्यांचा नदी सोबतचा परस्पर सबंध बघता बघता अनेक गोष्टी मी लिहून ठेवीत असे. धबधब्यात कधी जीवावर बेतलेला प्रसंग अन प्रसंगवधान, अचानक नदीला आलेला पूर अन त्यातून सावरत पूर ओसरण्याची वाट बघत काढलेली रात्र, अशा गोष्टी लिहून न ठेवताही लक्षात आहेत, जशाच्या तशा. त्यातून कोरकू आदिवासींचा नदीचा असलेला रोजचा संबंध अन त्यातून तयार झालेले एक नाते. या साऱ्या अनुभवातून अनेक गोष्टी शिकता आल्यात, आणि मेळघाटातील या नद्यांचा एकूणच पसाऱ्याचा नकाशा मन:पटलावर तयार होत गेला.

अलीकडच्या काळात सर्वत्र पाण्याचा प्रश्न भेडसावत असतांना, सुमारे ३००० चौ. किमी च्या या विस्तीर्ण जंगलातून उगम पावणारे अनेक नाले अन नद्या उन्हाळ्यात सुद्धा आपले अस्तित्व जिवंत ठेऊन असतात, भर उन्हाळ्यात कुठे बारीकशी धार तर कुठे डोहात उरलेले पाणी तहानलेल्या जीवांसाठी वरदान ठरत असते. पावसाळ्यात या नद्यांच्या पाण्यावर विदर्भातीलच नव्हे तर थेट खानदेशा पर्यंतच्या प्रदेशातील शेतीचे सिंचन होत आहे. खानदेशातील तापीवरील हतनूर धरण, अकोला जिल्हातील वान प्रकल्प, अमरावती जिल्ह्यातील शहानूर प्रकल्प पोसले जातात ते मेळघाटातील याच नद्यांवर.

मेळघाटातील आदिवासी कोरकू आणि येथील नद्यांचे अतूट असं नातं आहे. सर्वत्र असतात तसी कोरकुंची लहान लहान गावं लहान मोठ्या नद्याकाठी वसलेली असून पिण्यासाठी, गुरांसाठी, आंघोळीसह, कपडे धुणे ह्या दैनंदिन गरजा नदीवरच पूर्ण होत असतात. जरा उन्ह चढले कि घरचे कपडे, धुण्याची भांडी, पाणी भरण्यासाठी भांडी घेऊन बायका नदीवर दिसू लागतात. ही कामे सुरु असतांनाच कोपऱ्यातील प्रवाहात कुठेतरी लुगाड्याचे कापड बांधून मासोळ्या पकडणे सुद्धा सुरु असते. कोरकू पुरुष शेतात किंवा जंगलातील कामावर जातांना नदीच्या प्रवाहात कुकरी किंवा खेकडा लाऊन जातात, परत येतांना गोळा झालेल्या मासोळ्या किंवा खेकडे घेऊनच तो घरी परततो. बांबू पासून विणून तयार केलेलं नळकांड म्हणजेच कुकरी नदीत जागोजागी दिसतात. तरुण मुले किंवा बच्चे कंपनी दिवसातला बराच वेळ नदीत डुंबण्यात किंवा नदीभोवताल घालवत असतात.

मेळघाटची ज्याला ओळख आहे त्याला मेळघाटातील नद्यांची नावं अगदी तोंडपाठ असतात. यामध्ये उत्तरे कडे वाहत जाऊन तापीला भेटणाऱ्या सिपना, गडगा, खापरा, खंडू, डोलार, ह्या नद्या तर दक्षिणेकडे खाली येणाऱ्या आडनदी, शहानुर, पठार,

चंद्रभागा, पूर्णा, बिच्छन, सापन आणि वान ह्या नद्यांचा समावेश आहे. मेळघाटातील पाच  नद्यांना आणि नाल्यांना सामावून घेत मेळघाटच्या पाण्यावर मोठी होऊन मेळघाटच्या सीमेवरून वाहणारी तापी पुढे खानदेशात जाते तर दक्षिणेकडे उतरणाऱ्या अनेक नद्या पुढे पूर्ण नदीला मिळून पूर्ण पुढे तापीलाच जाऊन मिळते. यातील काही नद्या ह्या मेळघाट व्याघ्रप्रकल्पाच्या जंगलातून उगम पावणाऱ्या आहेत तर काही लगतच्या मेळघाट लगतच्या गाविलगड टेकड्यांमधील जंगलातून.

मेळघाटच्या जंगलातील सर्वांच्या परिचयाची नदी म्हणजे सिपना. कोरकू भाषेत सागाच्या झाडाला सिपना म्हणतात. मेळघाटचे जंगल साग बहुल असल्यामुळे या जंगलाच्या प्रमुख भागातून वाहणाऱ्या नदीला कोरकुंनी सिपना हे नाव दिलेले आहे. हि नदी सातपुड्यातील सर्वात उंच ठिकाण चिखलदऱ्याच्या उत्तरेकडील पंचबोल पाइंट आणि मेळघाट सीमेवरील मेमना गावापासून उगम पावून सोकरी नावाने कुंड मार्गे कोलकास पर्यंत पोहोचते, तिकडे मेळघाटातील दुसरे सर्वात उंचीचे ठिकाण माखला गावाच्या सपाटीपासून उगम पावणारा भूतखोरा नाला आणि चिखलदरा सेमाडोह रस्त्यावर लागणारा आमाडोह नाला हे दोन्ही सेमाडोह जवळ भेटतात अन येथून ही नदी सिपना हे नाव धारण करते.  आमाडोह नाला सेमाडोह ला भेटण्यापूर्वी जवारकुंड नावाच्या ठिकाणी धबधबा होऊन कोसळतो.  सेमाडोह गाव, पर्यटक संकुल पिली अशी वाहत पुढे चिखलदरा कडून आलेल्या सोकरी नाल्याला कोलकाज जवळ येऊन भेटते. पुढे  कुवापाटी, खारी, केली, भूलोरी अशा लहानमोठ्या नदी नाल्यांना पोटात घेत सिपना मोठी मोठी होत मेळघाटातून सुमारे ४० किमी चा प्रवास करीत हरिसाल, दिया, उतावळी, धरणमहू मार्गे प्रवास करीत चेथर या गावाजवळ तापीच्या पोटात गुडूप होऊन जाते. या ठिकाणी अप्पर तापी प्रकल्पाचा दुसरा टप्पा म्हणजेच मोठे धरण बांधणे प्रस्तावित होते, मात्र, मेळघाटातील महत्वाचे जंगल पाण्याखाली येणार असल्यामुळे हा प्रकल्प तूर्तास थंड बस्त्यात आहे.

मेळघाट व्याघ्रप्रकल्पातून उगम पावणारी आणि तापीला जाऊन मिळणारी दुसरी महत्वाची नदी म्हणजे खापरा. या खापरा चा उगम मेळघाटच्या बहुविविध वापर क्षेत्रातील म.प्र. सिमेकडील जरिदा व चुनखडी गावालगतच्या डोंगर कपारीतून होतो. रायपुर ते बोराट्याखेडा रस्त्यावरील कवळा नाला, रायपुर ते हतरु रोड वरील बेलाडोह नाला तसेच  रबांग, सुकळी हल्दूतलाइ, धोधन, खोरा अशा अनेक लहानमोठ्या नाल्यांना आपल्या उदरात समावून घेत, या क्षेत्रातील रायपुर या एका मोठ्या गावाजवळून वाहत जाऊन पुढे हि नदी व्याघ्र प्रकल्पात प्रवेश करीत रंगुबेली या गावाजवळ तापीच्या उदरात सामावून जाते. तापीला भेटण्यापूर्वी या ठिकाणी या नदीचे सौंदर्य अप्रतिम बहरते, संपूर्ण खडकातून वाहणारा प्रवाह दोन्ही बाजूंनी हिरवीकंच गच्च झाडी, संथ झालेल्या पाण्यात त्याचे उमटलेले प्रतिबिंब, हे दृश्य एखाद्या खाडीप्रमाणे भासते. सुमारे ७० किमी चा प्रवास करणारी हि नदी मेळघाट च्या उत्तरेकडील भागातून वाहत जात असल्यामुळे व हा भाग अतिशय दुर्गम असल्यामुळे फारशी कुणाच्या परिचयाची नाही.

खापरा नदीच्या परिसरातील दुसरी छोटीशी नदी म्हणजे खंडू. खंडू नदीचा उगम जरिदा व चुनखडी भागातील जंगलातूनच होतो, मध्यप्रदेशातील खामला भागातील कुटुम, कोटणी, हझिरी अशा काही नाल्यांना पोटात घेऊन मोठी होत, मध्ये येणाऱ्या दुर्गम गावांना तृप्त करीत हि नदी मध्य प्रदेशात प्रवेश करून पुढे तापी नदीला जाऊन मिळते. हि नदी तापीला मिळणाऱ्या मेळघाटातील नद्यांपैकी सर्वात लहान अशी नदी आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या अकोला जिल्ह्यातील भाग म्हणजेच अकोट विभाग म्हणजे एक वन्यजीव संपन्न जंगल, त्यामानाने कमी उंचीच्या टेकड्या, काही सपाटीचे प्रदेश यामुळे या भागातील वन्यजीवन अलीकडे चांगलेच बहरलेले दिसते. या भागातून मेळघाटात प्रवेश होतो तो पोपटखेड, खटकाळी मार्गे. धारगड च्या पुढे हरिसाल कडील रस्त्यावर एक सर्वात उंचीचा भाग चढून जावे लागते, त्यास हाय पाइंट असे म्हणतात. या हाय पाइंट वरून उत्तरेस व दक्षिणेस काही नाले उगम पावतात, त्यातील उत्तरेकडे जाणारा नाला म्हणजेच गाडगा नदीचा उगम आणि दक्षिणेकडे निर्माण होणाऱ्या प्रवाहातून पठार नदी प्रसवते. पठारवर खाली  पोपटखेड जवळ एक लहान धरण सुद्धा आहे. खटकाळी ते हरिसाल मार्गावर कोहा पर्यंतचे जंगल अतिशय संपन्न असून रस्ता घाटवळणाचा व थेट हिमालयाची आठवण करून देणारा आहे. एकीकडून उंच कडा अन एकीकडून खोल दरी अन मधून चिंचोळा, नागमोडी रस्ता जातो, या दरीतून काटकुंभ नाला, टेंभरु नाला, जांबू नाला असे अनेक नाले उगम पावतात व गाडगा नदीला भेटतात, पुढे बेलकुंड जवळ एका नाल्यावर सुमारे १३० वर्षे जुना उंच असा ब्रिटीश कालीन दगडी पूल आहे. हा नाला वाहत पुढे कोहा गावाजवळ येतो, हीच ती गडगा नदी. या नदीवरील आणखी काही ब्रिटीश कालीन पूल ओलांडून रस्ता शेलू फाट्यावरून ढाकना कडे जातो. हि नदी सुद्धा रस्त्यासोबत ढाकना कडे वळते, पुढे गाडगा भांडूम, गाडगा मालुर, गौलखेडा गावाजवळून वाहत धरणी बुऱ्हानपूर रस्त्यावरील धूळघाट गावाजवळ रस्त्याला आडवी जाऊन थोडे पुढे आमनेर किल्ल्याजवळ तापीला जाऊन मिळते. या भागात या नदीचे महत्व इतके कि इकडची गावं नदीच्या नावाने ओळखल्या जातात.

मेळघाटचे गर्भगृह म्हणजेच कोर एरिया, म्हणजे गुगामल राष्ट्रीय उद्यान, या परिसरात कडक निर्बंधामुळे सहसा कुणाला जाता येत नाही. या परिसरातून उगम पावणारी नदी म्हणजे डोलार. कोर एरियातील कोकटू परिसरातील चिपी हा नाला, अन निर्मनुष्य अशा डेड्रा खोऱ्यातून येणारा दुसरा नाला कोकटू च्या प्रसिद्ध विश्रामगृहासमोर भेटतात, पुढे अनेक लहान लहान नाल्यांपासून निर्माण होणारी नदी डोलार गावाजवळून वाहतांना डोलार हे नाव धारण करून गुगामल राष्ट्रीय उद्यानाच्या बाहेर पडते. मेळघाटातून अवघा ३१ किमी चा प्रवास पूर्ण करून हि नदी पुढे गाडगा नदीला येऊन मिळते.

तापी नदीला न भेटणारी मेळघाटातून उगम पावणारी महत्वाची नदी म्हणजे वान. अकोट ते धारगड रस्त्यावर गुल्लरघाट च्या अलीकडे एक सुंदर असा धबधबा आहे, सुलई नाला अशी त्याची ओळख. हा नाला किंवा धबधबा वान नदीचा उगमस्थान म्हटल्या जाऊ शकते. हा नाला पुढे नरनाळा किल्ल्याच्या पाठीमागून वाहत, गुल्लरघाट पुढे धारगड विश्रामगृहाच्या जवळून वाहत पुढे मेळघाटच्या वान अभयारण्यात प्रवेश करतो, येथून या नदीची ओळख वान नदी अशी होते, धारगड परिसरातील बोरीकडून येणारा नाला पुढे कोडू, चोरपानी, बोगदा, दलसिंग, बीटनेल असे अनेक नाले मिळून प्रथम पूर्व- पश्चिम अशी वाहत मोठी होत शेवटी दक्षिणेकडे वळून अभयारण्यातून बाहेर पडते. येथेच वान आणि अंबाबरवा अभयारण्याच्या सीमेवर वारीचा मारोती परिसरात या नदीवर हनुमान सागर नावाचे मोठे धरण बांधलेले असून या धरणाचे बँक वाटर या दोन्ही अभयारण्यापर्यंत येते. पूर्वीच्या काळी बन गंगा नावाने परीची असलेली ही नदी वान झाली ती वान अभयारण्यामुळे. धरणाच्या पाण्यावर तेल्हारा तालुक्यातील हजारो हेक्टर शेतीचे सिंचन करून अकोट शहराची तहान भागवून हि नदी पुढे बुलढाणा जिल्ह्यात पूर्ण नदीला जाऊन मिळते.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे शेवटचे अभयारण्य म्हणजे अंबाबरवा. बुलडाणा जिल्ह्यात येणाऱ्या या अभयारण्यातून उगम पावणारी एकमेव नदी म्हणजे आडनदी. हि नदी म्हणजे येथील वन्यजीवांसाठी जीवनदायिनी आहे. उन्हाळ्यात मात्र या नदीला पाणी राहत नसल्यामुळे वन्यप्राण्यांना पाणवठ्यावर तहान भागवावी लागते. आडनदीला पाणी पुरविण्यासाठी या जंगलातील नाले म्हणजे हेलाबोडी, महादेवखोरं, असे मोजके नाले आहेत. डिसेंबर नंतर हे नाले सुद्धा आटतात. जवळपास ७०० मिली इतका पाऊस पडूनही आणि मेळघाट जंगलाचा सलग पट्टा असूनही गेल्या अनेक दशकात या भागातील जंगलाची वाताहत झाल्यामुळे येथील जलस्त्रोतांवर हि परिस्थिती ओढवलेली आहे, अभयारण्य घोषित झाल्यानंतर, आणि अलीकडे येथील गावांचे पुनर्वसन झाल्यापासून जंगलाचा पोत सुधारतो आहे, ही समाधानाची बाब होय.


गेल्या ४५ वर्षापासून संरक्षित असलेला मेळघाट आणि काही भाग गेल्या २२ वर्षापासून संरक्षित झालेला असून त्यामुळे येथील जंगलाचे पर्यायाने येथील एकूणच सृष्टीचे संवर्धन होत असल्यामुळे जीवन दायिनी ठरत असलेल्या नद्यांचे भवितव्य सुद्धा सुरक्षित झाले आहे, संरक्षित क्षेत्रा बाहेरील जंगलांची आणि तेथील नैसर्गिक जलस्त्रोतांची परिस्थिती तितकी चांगली नाही हे निश्चित. भविष्यात पाण्याची शाश्वती हवी असल्यास त्या त्या भागातील जंगल वाचविणे फक्त वन्य जीवांसाठीच नव्हे तर आपल्या जीवन मरणासाठी सुद्धा आवश्यक आहे.

डॉ. जयंत वडतकर
मानद वन्यजीव रक्षक तथा सदस्य,
महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ
9822875773


मेळघाटच्या सीमेवरून वाहणारी तापी नदी


फावल्या वेळातील कोरकुंची मासेमारी

कोलकाज जवळून एस आकारात वाहणारी सिपना नदी येथेच प्रसिद्ध असे कोलकाज चे विश्रामगृह आहे



# Flattened Fauna of the Forest

One of the major factors affecting faunal survival is our road network. Road kills are documented widely and affect all taxonomic groups, especially in protected areas. Animals don't recognize a road as a hazard. Often, the road might have cut through a continuous patch of forest, and animals will have to cross these man-made roads in search of food, mates and other resources, like water.

The vast majority of wild animals / species (99%) dying on roads are never recorded. Large charismatic mammal deaths such as tigers and elephants dying are recorded but thousands of rare, endangered species of birds, amphibians, small mammals and reptile mortalities go unrecorded.

Roads and Railway lines have claimed the lives of at least 16 tigers across India over the last few years. Over 150 wild elephants have died while crossing railway tracks across the country in the last 8-10 years. There is scant data available about other equally rare, endangered and threatened species of amphibians, birds (owls, nightjars, horned larks) and reptiles (king cobra, python) which die in thousands. Mortalities of other endangered species of mammals such as leopard, sloth bears, wild dogs, wolves, jackals, hyena, Indian fox, honey badgers, otters, langur monkeys as well as herbivores such as Indian gaur, spotted deer, barking deer, nilgai and sambar go unrecorded.

Melghat, although doesn't have a very busy network of road, but there can be some hot-spots where road-kills are often filed. Semadoh-Dharni (Khandwa) Highway is one of the busiest routes in Melgaht, here even after a strict vigil by the Department there are cases of road-kills recorded.

Threats on our Wildlife and how it leads to Road-Kills of Animals.

1. First and the foremost reason for Road-kills are, Habitat Degradation and Fragmentation.
2. Habitat loss.
3. Forest Fires.
4. Poaching. Etc.

Infrastructural projects such as Roads, Railways are the most dominated structures on the planet and are present almost everywhere. With constant rise in the population and vast economic growth, the exigency of more lattice of roadways in the country is rising.

## Mitigation Measures

These intensifying impacts of the infrastructural boom, should be treated with various Mitigation measures. The concerned Forest Departments are constantly trying to limit the Road-kills, but such mitigation approach needs vast inputs. Role Local NGO's, Involvement of villages (villagers) residing in Forest, Citizen Science Project, Data collection and systematic handling of data. However, there should be an approach followed by the Tourists and passer-by traffic, is to Tag along with the Speed Limitations prescribed by the Department. Programs for Public Awareness would majorly support the cause to lessen the number of Road-kills in Forest.

'Roadkills' app which is an initiative by WCT, similarly WIT has an application too, which allows commoners to record roadkills on National Highways. This is a citizen science initiative, which democratizes roadkill data for further mitigation measures. Hence, Public involvement in such projects heightens the conservation methods. Such initiatives would lead to systematic documentation and will make common public known to wildlife and its concerns.


**(Prathamesh Dilip Tiwari)**
Wildlife Biologist
Melghat Tiger Reserve

# Why Magical Melghat...???



आज जादूच झाली, सकाळीच जंगल सफारी ला निघालो तेच आमच्या जिप्सी चा फोर व्हिल ड्राईव्ह चा गियर अडकला आणि आम्ही जंगलाच्या सुरवातीलाच ३ किमी ला जाऊन अडकलो, तोच आम्ही ड्राइवर ला विनंती करून दुसरी गाडी लवकरात लवकर आणायला सांगितली पण सकाळची ६ वाजताची वेळ तो एकटा पायदळ परत गेट वर जायला भीत होता त्यामुळे मी आणि माझा एक मित्र दोघे जण त्याच्या सोबत जायला तयार झालो आणि निघालो, सकाळची वेळ आणि जंगल यामधून चालत असताना मनात असणारी वाघ, बिबट किंवा अस्वलाची भीती कि, कदाचित यापैकी काही दिसले तर आमचे कसे होणार त्यात ड्राइवर म्हणाला कि सर वाघ किंवा बिबट दिसला तर चालेल पण अस्वलाशी सामना व्हायला नको कारण अस्वल फार विचित्र प्राणी आहे, तोच जंगलाच्या शांत वातावरणात हळूहळू पाऊल उचलत मनात भीती घेऊन कसेबसे अर्धा तासाचे अंतर गाठत पोहचलो गेट वर आणि सुटकेचा श्वास टाकला. ड्राइवर नी दुसरी गाडी घेतली आणि आम्ही दोघे त्यात बसून आलो परत त्याच ठिकाणी जिथे गाडी बिघडलेली होती तेथून बाकीचे चार मित्र या गाडीत बसवले आणि पुन्हा सुरु केला जंगल सफारी चा प्रवास तोच गुल्लरघाट गेट ला पोहचलो आणि एन्ट्री केली आता समोर निघणारच तर लक्षात आले की, या गाडीचा मागचा टायर पंक्चर झाला आहे, आम्ही आधीच फार चिडलेलो होतो कारण पहिल्या गाडीमुळे आम्ही त्रासून दुसऱ्या गाडीत बसल्यावर हे असे नको व्हायला पाहिजे होते, तरी आमची जिद्द टोकालाच होती आम्ही सर्व मिळून त्या गाडीचा टायर बदलविला आणि विचार केला की, आजचा दिवस फारच खराब आहे आमच्यासाठी आणि आज आमच्यासोबत काहीही होऊ शकते, तोच ड्राइवर ला सांगितले की, दादा आपल्या सोबत एक वॉकी-टाकी घे कारण आजचा आपला दिवस फार खराब आहे आणि त्यांनी घेतला देखील पण आजचा दिवस खराब असल्यामुळे आम्हाला फक्त काही चितळ आणि एक रान मांजर दिसली आणि आम्ही परतीच्या दिशेने निघालो तोच मला मागच्या सफारीत टायगर कॉलिंग ऐकली होती त्या ठिकाणी एकदा जायचे असे म्हणून मी गाडी त्या ठिकाणी घ्यायला लावली आणि त्या ठिकाणी पोहचलो. गंमत अशी की, सर्व फार निराश थकलेले आणि मनात एकाच विचार की, आता बाहेर पडल्यावर येथे कधीच परत न यायचे तोच त्यात गाईड भर घालत होता की, सर चला इथे काहीच नाही पाहायला मिळणार, मी शांततेत त्याला म्हणालो २ मिनिटे शांत राहा आणि मग निघून जाऊ. पण २ मिनिटे झाल्यावर सुद्धा काहीच नाही झाले आता मात्र सगळ्यांचाच पारा चढला होता आणि सगळ्यांची चिडचिड करायला सुरूवात झाली आणि सगळे मोठमोठ्याने बोलायला सुरु झाले आणि माझी मात्र उत्कंठा की, इथे टायगर ची एक कॉलिंग तरी ऐकायला मिळेल म्हणून कारण मला फक्त त्याचा आवाज ऐकायचा होता बाकी तो नाही दिसला तरी चालेल अशी स्थिती होती म्हणून मी निसर्गाचे नियम लक्षात घेऊन आजूबाजूच्या हालचालींवर लक्ष ठेवत टायगर चे पगमार्क रस्त्यावर मिळतात का म्हणून जिप्सी च्या खाली पाय ठेवला तोच मोठ्याने डरकाळी फोडल्याचा आवाज आला आणि सर्व शांतता पसरली, आणि मी सर्वांना गप्प करत पटकन जिप्सी मध्ये चढलो पण मात्र टायगर कॉलिंग सुरूच, काहींचे म्हणणे होते की, हा आवाज अस्वलाचा आहे पण मी मात्र ठाम होतो कारण आजचा दिवस हा फारच खराब गेला होता आणि आता काहीच अपेक्षा नव्हती तरी मला हवी असलेली कॉलिंग मला ऐकायला मिळाली मी जाम आनंदी झालो होतो आणि तोच कॉलिंग चा आवाज कमी

कमी होत नाहीसा झाला, आम्हाला समजले की, तो आम्हाला बघून दूर निघून गेला, मग आम्ही परत निघालो तेव्हा आमच्यापैकी एकाला एक वाघीण आणि तिचा एक छोटासा बछडा पाणी पितांना दिसला आणि तो ओरडला आणि त्या वाघिणीकडे हाताचा इशारा करत मोठ्याने बोलला, हा काय वाघ...!!! आम्ही बघतो तोच वाघ दिसत क्षणीच डोळ्यांच्या पापण्या लागेपर्यंत गायब झाला पण किमया हि होती की, त्या वाघिणीला असणारा तिचा एक किंवा दोन महिन्याचा बछडा हा काहीतरी शिकार खाल्यामुळे सुस्त चालत होता पण तरी मात्र आम्हाला त्यांचे स्पष्ट दर्शन झाले नाही, सतत एक तास उलटून गेला तरी त्या वाघिणीने आम्हाला तिचा एक सुद्धा फोटो काढण्याचा मोका दिला नाही, कारण ती वाघीण सतत वर टेकड्यावर चढून जायची पण तिच्या पिल्लामुळे परत खाली यायची आणि मेळघाट च्या या जंगलात झाडाझुडपांमध्ये लपून जायची असे जवळपास दीड तास झाल्यावर मात्र आम्हीच थकलो आणि म्हणालो की पुन्हा कधीतरी येऊ भेटायला आणि फोटो काढायला आज तुझे दर्शन मेळघाटात झाले आणि तुझा डरकाळीचा आवाज ऐकायला मिळाला एव्हढेच भरपूर झाले होते आमच्या साठी. देवाचे स्मरण करून आम्ही निघणारच तर आमच्यापैकी एकाने पुन्हा फक्त दोन मिनिटे मागितली आणि एकदा गाडी रिव्हर्स घेऊन मग निघूनच जाऊ मग मागे नाही येऊ म्हणून गाडी रिव्हर्स घ्यायला लावली तोच बघतो तर काय ती वाघीण एका झाडाच्या मागे बसलेली स्पष्ट दिसत होती तिचा रुबाब आणि धिप्पाड शरीर बघून आम्ही चकितच राहिलो की काय मेळघाट आणि मेळघाटचा वाघ आणि तोही एका सुंदर पिल्लासोबत आमच्या समोर फक्त एका नाल्याचे अंतर आणि तो समोर बसलेला, आज मेळघाटातील आमचा दिवस खराब नाही सुवर्ण क्षणांचा निघाला होता कारण वेळ ही सांगून येत नाही तर ती आपला वेळ तिच्या संमतीने सुसंगत करत असते आपला चांगला काळ हा नेहमीच वाईट काळानंतर येतो हे सांगत असते असाच काही जादुई क्षण चालून आला होता आमच्याजवळ कारण मेळघाटात वाघ दिसणे कठीणच आणि त्यातल्या त्यात दोन तास वाघाचे दर्शन आणि तेही एका पिल्लासोबत म्हणजे फारच विलक्षण क्षण होता... त्या शेवटच्या दोन मिनिटात मला त्या वाघिणीचा एक सुंदर आणि माझा मेळघाटातील पहिला वाघाचा फोटो काढायला मला भेटला याचे आश्चर्य मला आजपण आहे विशेष म्हणजे वाघीण आणि तिच्या पिल्लाचा दोघांचाही फोटो मेळघाटच्या झाडाझुडपांमध्ये काढायला मिळाला याला मेळघाट चे आभारच म्हणावे लागेल.



**Crested Serpent eagle**



**Nilgai**



**Common Crow butterfly**



**Wild dog**



**Red Damselfly**



**Spotted Deer**

मेळघाट म्हणजे खरंच जादूच आहे कारण तुम्हाला काय कधी बघायला मिळेल हे सांगताच येत नाही. पण एक मात्र खरे आज पण मी मेळघाट फिरतो पण आजपर्यंत फिरल्यावर मी हेच सांगतो की, तुम्हाला वाघ पाहायला मिळेल किंवा तुमची ट्रिप फारच चांगली जाईल याची अपेक्षा सोडून फक्त मेळघाट फिरण्याचा आनंद घ्या, मेळघाट तुम्हाला ते देईल ज्याची तुम्हाला अपेक्षा पण नसेल.

या घटनेत आम्ही सहा मित्र आहोत त्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.
श्रीकांत रामेकर, सुरज भट्टड, गोविंद आजळकर, दिनेश डोंगरे, संजय जामनिक आणि मी (अंगुल खांडेकर)

ड्राइवर - सलमान शेख,

गाईड - बाबुलाल कासदेकर,

स्थळ - शहानुर-धारगड-बोरी सफारी.

धन्यवाद !



Angul Khandekar
9423051206



# वानमधील दुर्मिळ पक्षीसंपदा

एखादा पक्षीनिरीक्षक अथवा पक्षीछायाचित्रकार विविध अधिवासात जाऊन पक्षांचे निरीक्षण अथवा छायाचित्रण करतो. पण जेव्हा मेळघाट मध्ये जाण्याचा योग येतो तेव्हा कुणीही ते टाळत नाही. कारण पक्षांच्या विविध व दुर्मिळ प्रजातींचा वावर मेळघाटसारख्या पाहाडी भागातच दिसून येतो. तेव्हा त्यांचे दर्शन घ्यायचे असेल तर मेळघाटसारख्या पहाडी घनदाट जंगलात जाण्याशिवाय पर्याय नसतो. मेळघाट मधील वान हे अभयारण्य असेच निसर्गसंपन्नतेने नटलेले असल्याने तेथे काही दुर्मिळ पक्षी प्रजाती कदाचीत याच ठिकाणी पाहावयास मिळते. सातपुडा पर्वतरांगेतील मेळघाटच्या जंगलास १९७३ साली व्याघ्रप्रकल्प हा दर्जा प्राप्त झाला. पुढे सातपुडयातील वाघांना मुक्त संचारासाठी भ्रमणमार्ग उपलब्ध हवावे किंवा आहेत ते टिकून राहावेत या उद्देशाने मेळघाटलगताचा नरनाळा किल्ला परिसर, मेळघाटच्या गाभा क्षेत्रालगत असलेले वान वान नदीच्या परिसरातील जंगल व बुलढाण्या जिल्ह्यातील अंबाबरवा जंगल अभयारण्य घोषीत करून या तीनही अभयारण्याला मेळघाटशी जोडण्यात आले. यातील वान अभयारण्य म्हणजे वान नदीचे उगम असलेले क्षेत्र. २११ चौरस किलोमीटर आकाराच्या या अभयारण्यात शुष्क पानगळीचे जंगल आहे. येथील अधिवास विविधतेमुळे जैवविविधता संपन्न आहे. नदी, नाले, धरणाचे बुडीत क्षेत्र त्यातील निर्माण झालेले बेट, गवताळ पट्टे उंच पाहाडी प्रदेश अशा जैवविविधतेमुळे येथे विविध प्रजातीचे पक्षी आढळतात. आतापर्यंत वान अभयारण्यामध्ये स्थानीक व स्थलांतरीत अशा १९८ प्रजातींच्या पक्षांची नोंद झाली आहे. येथील वान नदी व धरणाच्या बुडीत क्षेत्रात हिवाळयादरम्यान युरोपातून विविध प्रकारची स्थलांतरीत बदके मोठ्या प्रमाणात आढळतात. बर्याच पक्षीप्रजातींची ईथे रेलचेल असली तरी काही प्रजाती त्यांच्या दुर्मिळतेने नेहमीच स्मरणात राहतात.

घुबड व पिंगळा (Owl & Owlet) या विदर्भातल्या १४ प्रकारच्या प्रजाती येथे आढळतात. तसेच दुर्मिळ प्रजाती रानपिंगळा (Forest Owlet) या ठिकाणी नियमितपणे प्रजनन करतांना दिसून येतो. स्थलांतरीत दुर्मिळ घुबडांमधील युरेशीयन शिंगळा हे घुबडही ईथे दिसले आहे. उन्हाळ्यात थेट पाकिस्तान मधून स्थलांतर करणारे हे घुबड अतीशय दुर्मिळ मानल्या जाते. काही वर्षापूर्वी वान मध्ये आपले भक्ष पकडताना दिसून आले. वान मधील विश्रामगृहा जवळ उंदराची बिळ दिसून येतात. उन्हाळ्यामध्ये तिथे मोठ्या प्रमाणात उंदरांची गर्दी असते. त्याला पकडतानाचा क्षण कॅमेरामध्ये टिपण्यात आले. चीमणीहून छोट्या आकाराचे असणारे रामगंगा (Tit) पक्षी हा एकटा, कळपाने, किंवा ईतर कीटकभक्षक पक्षांसोबत दिसून येतो. आपल्या सतत असणार्या आनंदी चिवचिवाटाने ते आपले लक्ष वेधून घेतात. कीटक त्यांच्या अळया व अंडी हे त्यांचे मुख्य अन्न ते शोधण्यासाठी झाडाच्या खोडावर तणाव्यांवर हा उलटासुलटा लोंबकळतो, फूलामध्ये खोडामध्ये शोधत राहातो. पायात फळे अटकून आपल्या जाड चोचीने बाह्य कवच फोडून त्यातील बी हे पक्षी खातात. आपल्याकडे सर्वसामान्यपणे कवडी रामगंगा (Great Tit), पिवळी रामगंगा (Indian Yellow Tit) आढळून येतात. प्रामुख्याने हिमालयाकडील प्रदेशात आढळणारा नारंगी डोक्याचा रामगंगा (Fire-capped Tit) ची उपस्थीती वान मध्ये आढळते. माथा व गळ्यावर लालभडक नारिंगी रंग असल्याने ही टीट खूपच आकर्षक दिसतो.



वडाच्या झाडावरील किडे टिपताना नारंगी डोक्याचा रामगंगा



उंदराच्या शिकारीसोबत युरेशियन शिंगळा

विदर्भात धीवरच्या (Kingfisher) ५ प्रजाती आढळतात. करकोचाप्रमाणे चोच असलेला बलाक चोच धीवर (Stork billed Kingfisher)हा मेळघाटच्या नदीवर बहुधा दिसून येतो. परंतु सर्वात दुर्मिळ काळ्या टोपीचा धीवर (Black-caped Kingfisher) वान जंगलातच दिसून येतो. डोक्यावरील काळ्या भागाने त्याने काळी टोपी परिधान केल्याचा भास होतो. वान नदीच्या काठाने फिरल्यास हा एक-दोन ठिकाणी शिकार करतांना दिसून येतो. उथळ असलेल्या वान नदीच्या दगडी काठावर बसून पाण्यातील छोट्या-छोट्या मासळी हा दिवसभर पकडत असतो. जरा लाजाळू असल्याकारणाने आपली चाहूल दुरून जरी लागली तर त्याच्या नेहमीच्या जागेवर बराच वेळ येत सुद्धा नाही. पण थोडा सयंम ठेवून बसले तर त्याचे दर्शन होऊ शकते.

स्वत:ची अंडी दुसर्याच्या घरट्यात घालून आपली जबाबदारी झटकणारी कोकीळ प्रजातीची दुर्मिळ जात लाल पंखाचा चातक (Chestnut winged Cuckoo) नोंद वानमध्ये झाली आहे. विदर्भात जवळपास ९ प्रकारच्या कोकिळा आढळून येतात. त्यापैकी केवळ ३ कोकीळ स्थानीक असून बाकीच्या कोकीळ स्थलांतर करून येतात. या स्थलांतरीय कोकिळा मधील सर्वात मोठी व आकर्षक म्हणजे लाल पंखाचा चातक आहे. ही कोकीळ हिमालयाकडून दक्षिण भारतात स्थलांतर करते व तेथून थेट श्रीलंका गाठते. तेव्हा येथील तीच्या नोंदीने तीचा स्थलांतराचा मार्ग वान अभयारण्यातून असल्याचे सिद्ध झाले आहे. यावरूनच वान या अभयारण्याचे महत्व सिद्ध होते. वान अभयारण्य पक्षीनिरीक्षकांच्या दृष्टीने स्वर्ग आहे. त्यामुळे खरा पक्षीनिरीक्षक एकदा तरी वान अभयारण्याला भेट देतोच.

विदर्भात धीवरच्या (Kingfisher) ५ प्रजाती आढळतात. करकोचाप्रमाणे चोच असलेला बलाक चोच धीवर (Stork billed Kingfisher)हा मेळघाटच्या नदीवर बहुधा दिसून येतो. परंतु सर्वात दुर्मिळ काळ्या टोपीचा धीवर (Black-caped Kingfisher) वान जंगलातच दिसून येतो. डोक्यावरील काळ्या भागाने त्याने काळी टोपी परिधान केल्याचा भास होतो. वान नदीच्या काठाने फिरल्यास हा एक-दोन ठिकाणी शिकार करतांना दिसून येतो. उथळ असलेल्या वान नदीच्या दगडी काठावर बसून पाण्यातील छोट्या-छोट्या मासळी हा दिवसभर पकडत असतो. जरा लाजाळू असल्याकारणाने आपली चाहूल दुरून जरी लागली तर त्याच्या नेहमीच्या जागेवर बराच वेळ येत सुद्धा नाही. पण थोडा सयंम ठेवून बसले तर त्याचे दर्शन होऊ शकते.

स्वत:ची अंडी दुसर्याच्या घरट्यात घालून आपली जबाबदारी झटकणारी कोकीळ प्रजातीची दुर्मिळ जात लाल पंखाचा चातक (Chestnut winged Cuckoo) नोंद वानमध्ये झाली आहे. विदर्भात जवळपास ९ प्रकारच्या कोकिळा आढळून येतात. त्यापैकी केवळ ३ कोकीळ स्थानीक असून बाकीच्या कोकीळ स्थलांतर करून येतात. या स्थलांतरीय कोकिळा मधील सर्वात मोठी व आकर्षक म्हणजे लाल पंखाचा चातक आहे. ही कोकीळ हिमालयाकडून दक्षिण भारतात स्थलांतर करते व तेथून थेट श्रीलंका गाठते. तेव्हा येथील तीच्या नोंदीने तीचा स्थलांतराचा मार्ग वान अभयारण्यातून असल्याचे सिद्ध झाले आहे. यावरूनच वान या अभयारण्याचे महत्व सिद्ध होते. वान अभयारण्य पक्षीनिरीक्षकांच्या दृष्टीने स्वर्ग आहे. त्यामुळे खरा पक्षीनिरीक्षक एकदा तरी वान अभयारण्याला भेट देतोच.

**किरण मोरे**



वान व विदर्भातील पहीली नोंद लाल पंखाचा चातक



रानपिंगळा मादीला साद घालतांना..

# मेळघाट जंगलामध्ये मधुमेह रोगासाठी आढळणारी वनोऔषधी.

मधुमेह (इंग्रजी: डायबेटिस मेलिटस) या आजारात माणसाच्या शरीरातले स्वादुपिंड पुरेसे इन्शुलिन तयार करू शकत नाही (टाईप वन); किंवा शरीरातील तयार झालेल्या इन्शुलिनला पेशींकडून पुरेसा प्रतिसाद मिळत नाही (टाईप टू). या दोन्ही प्रकारात पेशींमध्ये ग्लूकोज शोषण्याच्या क्रियेत अडथळा येतो. मधुमेहाच्या रुग्णांमधे मूत्रविसर्जनास वारंवार जावे लागणे, थकवा, सतत तहान आणि भूक लागणे, वजन कमी होणे अशी लक्षणे दिसतात. यावर उपाय म्हणजे खाण्याच्या सवयी बदलणे, तोंडाने घ्यावयाची औषधे, आणि/किंवा काहीं रुग्णामध्ये दररोज इन्शुलिनचे इंजेक्शन घेणे,

तशेच आपल्या मेळघाट जंगलामध्ये असे काही आहेत कि मुधुमेह आजार नियंत्रणात करू शकतात.

१) Botanical Name - *Gymnema sylvestre*

Gulmar (गुलमार)

Family- Asclepidiaceae



गूळमार हा एक आर्युवेदिक औषधी वनस्पती आहे याच्या पानाचा उपयोग मधुमेह उपचारावर मोठयाप्रमाणात केला जातो. या औषधी वनस्पती पानाची चव तुरट असते, जर याचे पान खाले असता तर आपण साखर खाले असता आपणास एक ते दोन तास चवीला गोड लागत नाही.

2) Botanical Name- *Pterocarpus marsupium*

Bijasag (बीजासाग)

Family- Fabaceae



बीजासाग हा एक आर्युवेदिक औषधी वनस्पती आहे याच्या खोडाच्या सालीचा उपयोग मधुमेह उपचारावर केला जातो. या वनस्पतीच्या खोडाची साल घरी आणली असता व त्या सालीचा काढा करून पिल्यास रक्तातील साखरेवर नियंत्रण करण्यात मदत होते.

३) **Botanical Name-** ***Syzygium cumini***

**Jambhul (जांभूळ )**

**Family - Myrtaceae**



- जांभळाचे बी व साल ही मधुमेह या आजारावर अत्यंत उपयुक्त आहे.
- जांभळामध्ये लोहतत्त्व जास्त प्रमाणात असल्यामुळे याच्या सेवनामुळे रक्त शुद्ध व लाल होते.
- पोटदुखी, अपचन, अशुद्ध ढेकर येणे अशा विकारांवर जांभळाचे सरबत प्यावे. जांभूळ हे दीपक, पाचक असल्याने न पचलेले अन्न पचण्यास मदत होते.
- यकृताची कार्यक्षमता वाढवून रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी.

**Bharat S. Chavhan**
**(Grassland Expert)**
**M.T.R.**

# PROMOTING SUSTAINABLE LIFESTYLES AMONG TRIBAL COMMUNITY IN MELGHAT LANDSCAPE



## Introduction

Wildlife Research and Conservation Society is implementing a project for promoting sustainable lifestyles for tribal community in Melghat Tiger Reserve in collaboration with Maharashtra Forest Department. The aim of this project is to reduce pressures on the habitat, so that Melghat can support a thriving population of the tiger and its prey species. At present WRCS is implementing this project in 10 villages in the tiger reserve and 5 villages in the territorial forest divisions.

## Reducing Firewood Dependency

Use of firewood for cooking is one of the major causes of tree cutting and degradation of the forest. In order to reduce firewood consumption a simple yet efficient improved cook stove (ICS) was designed. Initially a mud casting model of the cook stove was implemented. Later, considering the requirements of the people a cement model of cook stove was implemented. Totally 1850 ICS have been installed in 15 project villages. The ICS are very helpful for reducing the firewood consumption and reducing tree cutting.

## Environmental Education Programme in Tribal Schools

The children of today are the citizens of tomorrow. If children develop sensitivity towards environment and wildlife during their student years they will become responsible citizens who will support wildlife and forest conservation. An environmental education programme named *Nisarga Shala Melghat* was implemented in 23 ashram schools of Melghat. From each school 40 students of standard 7th, 8th and 9th were included in the programme.

The education officer visited each school and delivered the following modules in each class. In all the modules, the information was presented through photographs, video clips and graphics to make the session interesting and interactive. Students were taught about biodiversity of Melghat including birds, mammals, plants, snakes and reptiles and amphibians. The students and teachers were very interested to learn about snakes. Nature walks were conducted for giving the students firsthand knowledge about nature. The results are encouraging and it shows an improvement in biodiversity knowledge of the students.

## Livelihood Training

WRCS is carrying out a livelihood initiative with young men and women in the project villages. Women are trained in making handicrafts on the theme of tiger & owls. The handicrafts include key chains, car hangings, tote bags, sling bags, wallet pouches, wallet applique, earrings, bracelets, necklace, wind chimes and wall hangings etc. The handicrafts are sold by WRCS and women are paid for their work. This initiative has

created an alternative livelihood source for these women and is providing income to them. The households involved in this initiative are becoming our conservation partners. A painting training was conducted for youths in October 2018. Youths were trained in making painted colourful products on bamboo sheets such as coasters, wall hangings, bookmarks, keychains etc. The activity is being monitored by the village extension workers. So far 38 beneficiaries are trained in handicraft and painting.

Bamboo craft trainings were conducted at Chaurakund with help of expert trainers. So far 21 youths are trained in bamboo craft from 6 villages. They were given bamboo tool kits and provided good equipment for making bamboo items. They received orders to make bamboo products such as pen stands and planters. A bamboo craft centre has been set up at Chaurakund for making bamboo products. At present they are making bamboo sheets, coasters and pen stands.

## Tree Plantation

A tree plantation programme was carried out in 6 villages of Melghat Tiger Reserve in July, 2019 as part of the project for conservation of forests in Melghat. Totally 2232 useful plants were distributed in these project villages. Native trees and fruit trees were planted such as Bamboo, Mango, Jackfruit, Teak, Curry tree, Custard apple, Jamun, Drum stick, Tamarind and Guava. Plantation was carried out on the farm land belonging to local people. In 2020, with support of MTR authorities, it is proposed to carry out tree plantation on a larger scale in Melghat villages

## Bori Bagicha Programme

This is a model of kitchen garden wherein vegetable plants are planted in a gunny bags. The programme was implemented in Chaurakund village with guidance of Wildlife Trust of India (WTI). Kitchen gardens helps to improve nutritional levels in the village community. Farmers can grow different type of cucurbit crops like *doodhi*, *karela*, *dodka*, *bhopla*, *kakdi* etc. with little investment and effort and fulfill nutritional needs of the family. This year 79 beneficiaries participated in Bori Bagicha programme.

## Conclusion

WRCS will continue to implement and strengthen the sustainability and livelihood programme, thereby reducing pressure on forest and improving habitat for the tiger and prey species. WRCS is grateful for support by officers and staff of Melghat Tiger Reserve, Territorial Forest Divisions and Project Officer Dharni in implementation of the programme.

**Shubham Singh Badratiye**
**WRCS**







**Various Activites conducted by WRCS**

# पाणलोट विकासातून वने व वन्यजीव संवर्धन



पार्श्वभूमी

वर्ष 2011 मध्ये सत्यमेव जयते ह्या टेलिव्हिजन शो चे माध्यमातून समाज भान जागृत करणारे, समाजमन घडवणारे अभिनेते अमीर खान यांनी 2016 मध्ये त्यांचे मित्र सत्यजित भटकळ यांना सोबत घेऊन पाण्या च्या समस्येवर ठोस कृती म्हणून "सत्यमेव जयते वॉटर कप" ही संकल्पना पानी फौंडेशन च्या माध्यमातून व महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना, विभाग याना सोबत घेऊन महाराष्ट्रातल्या 4500 हजार गावात रुजवली.

या वर्षी मेळघाट टायगर रिझर्व्ह क्षेत्रातील चिखलदरा व धारणी हे दोन्ही तालुके, श्री प्रवीणसिंह परदेशी यांचे विशेष लक्ष मेळघाट क्षेत्रावर असल्याने घेण्यात आले होते. दोन्ही तालुक्यातील 232 गावांनी या वर्षी पानी फौंडेशन तर्फे पाणलोट विकासाचे प्रशिक्षण घेतले आणि चिखलदरा मधून 75 व धारणी मधून 55 गावांनी विविध पाणलोट कामे 45 दिवसाच्या कालावधीत केली.

मेळघाटात वॉटर कप ची सुरवात..

या वर्षी **अपर** प्रधान मुख्य वन संरक्षक श्री श्रीनिवासा रेड्डी यांनी सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा गावागावात पोहचावी या करिता डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन योजना अंतर्गत योजनेत समाविष्ट मेळघाटातील 40 गावांना निमंत्रित करून सेमाडोह संकुल येथे योजना परिचाय कार्यशाळा आयोजित केली. सिपना, गुगामल, पश्चिम आणि पूर्व वन्यजीव विभाग मेळघाट चे सर्व वरिष्ठ अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेत पाणलोट उपचाराचे तांत्रिक फिल्म चे 100 पेन ड्राईव्ह व 100 पुस्तक संच या वेळी वितरित करण्यात आले. या कार्यशाळे मूळे वॉटर कप स्पर्धेचा संदेश गावागावात पोहचला. या वर्षी MTR च्या धारणी चिखलदरा विभागाच्या बफर क्षेत्रातील 74 गावांनी या वर्षी पानी फौंडेशन चे प्रशिक्षण घेतले.

वॉटर कप स्पर्धा आणि वन संवर्धन

वॉटर कप स्पर्धेत मेळघाट च्या पहिल्या वर्षात प्रशिक्षणात सलग समतल चर (CCT) ह्या उपचाराचे प्रात्यक्षिक होते. मेळघाटात नॉन फॉरेस्ट जमिनीवर हे काम रोजगार हमी च्या माध्यमातून मोठया प्रमाणात झाले आहे. परंतु ज्याची आवश्यकता आहे अशी "शेती हेही एक पाणलोट क्षेत्र" ही संकल्पना मेळघाटात जास्त रुजली नाही. या वर्षी 78 गावांची शिवार फेरी केली असता 75% गावातील शेती 4 ते 15% उताराची आहे. शेतातील माती वाहून जाते. शेतात दगड शिल्लक राहतात. शेतात नाले तयार होतात. जंगलातील तलाव गाळाने भरतात. हे लक्षात घेता रोजगार हमीतून शेती क्षेत्राचा सुधार घडवून आणणे महत्वाचे होते. या करिता पानी फौंडेशन च्या प्रशिक्षणात मेळघाटातील गावाकरिता ढाळीचे बांध (Graded contour bund) हा उपचार प्रत्यक्ष शिकवण्यात आला.

मेळघाटातील 100 कुटुंबाचा शेतजमीन धारणा या विषयीचा अभ्यास केला असता. 80% कुटुंब अल्प भूधारक आहेत. जनगणना 2011 नुसार एकूण कुटुंब संख्या 21646 पैकी 12856 (59.39%) इतके खातेदार आहेत. आणि भूमिहीन 8790 (40.61%) कुटुंब आहेत. अशा परिस्थितीत शेती करिता जंगलतोड न करता वाहीती खलील क्षेत्र उपजाऊ करणे, पडित जमिनींचा विकास करून त्यातून जास्तीत जास्त उत्पादन

घेणे आवश्यक आहे. ढाळीचे बांधा मुळे शेती छोट्या छोट्या समतल तुकड्यात विभागून उपजाऊ करता येते. ढाळी चे बांध ज्या शेतकऱ्यांनी केले तिथे पिकांची विविधता वाढली. या बांधावरून जनावरांना गवत उपलब्ध झाले. मेहरिअम, कोटमी, कोहना, कुलंगणा, घुटी मलकापूर, बोथरा, बेरदाबरडा, कोठा, मोगरदा, चुरणी, या गावात हे काम झाले आहे. वॉटर कप स्पर्धेत वृक्ष संवर्धन याला 5 गुण होते. मेळघाट मध्ये वन क्षेत्र जास्त असल्याने गावानजीक चे जंगल जपत सोबत ढाळीचे बांध, माती धुरा बांध (compartment bund) यावर वृक्ष लागवड करून वन शेती हे धुर्यावरचे उत्पन्नाचे साधन कसे होऊ शकते. या बाबत जाणीव जागृती केली.

कडई, सालाई, चारोळी,आंबा, शेवगा, सीताफळ, बांबू, जांभूळ, जांब, सुबाभूळ गिरीपुष्प अश्या वृक्षाची नर्सरी 35 गावांनी केली. ही झाडे शेतकऱ्यांनी आपआपल्या शेतात बांधावर लावली. वनशेती ही संकल्पना आदिवासींचे जंगलावरील अवलंबित्व कमी करू शकते.

वॉटर कप मध्ये अजून एक महत्वाची संकल्पना म्हणजे आग पेटी मुक्त शिवार ही होती. याला मेळघाट करिता "आग पेटी मुक्त जंगल व शेत शिवार" असे नामकरण करून जनजागृती केली. मेळघाट च्या जंगलात.

दरवर्षी हजारो हेक्टर जंगल जळून जाते. उन्हाळ्यात शेतीची पूर्वतयारी म्हणून शेत साफ केले जाते. शेतातील काडी कचरा जमा करून जाळला जातो. धुरे पेटवले जातात. यामुळे ही आग मग शेताच्या बांधावरून जंगलात जाते असे सर्रास घडत आले आहे.

या कृती मुळे मातीचे सेंद्रिय कर्ब कसे कमी होत आहे, जंगल नष्ट होत आहे हे मातीच्या प्रयोगातून दाखवत व मातीचा सेंद्रिय कर्ब वाढवण्या साठी शेतातील पाला पाचोळा, काडी कचरा न जळता ते जमा करून कुजवून खत म्हणुन वापरता येईल. या माध्यमातून धुरे, काडी कचरा जाळणे थांबले. या सोबतच मोहफुलें वेचताना झाडाखाली आग न लावण्याचे नियम करून गावांनी मोहफुलें वेचले. या मुळे आगीवर नियंत्रण आले.

मेहरिअम, कोटमी, आवागड, माखला, घुटी, धाराकोट बोथरा या गावात असे नियम केल्या मुळे गावा शेजारील जंगलात आग लागली नाही. या वर्षी 31 गावातील 2114 सॅम्पल मातीचे सेंद्रिय कर्ब तपासणी मध्ये 87% माती ही सेंद्रिय कर्ब कमी-मध्यम आढळले आहे.

वॉटर कप स्पर्धेत बक्षीसपात्र गावांची कामगिरी

वॉटर कप स्पर्धेचा उद्देश समजून घेऊन जंगला चे नुकसान न करता शास्त्रशुद्ध पाणलोट कामे करणाऱ्या गावांना वन क्षेत्रात कामाची परवानगी मिळाली. या वर्षी मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील चिखलदरा-जारीदा रेंज च्या आवागड आणि धारणी- ढाकणा रेंज च्या बोथरा गावाने वॉटर कप स्पर्धेचे तालुका स्तरीय प्रथम पुरस्कार मिळवले. आवागड गावात रोजगार हमी चे माध्यमातून 4 जाळीचे बंधारे, 10 अनघड दगडी बांध, 10 हेक्टर वर सलग समतल चर, 5 हेक्टर शेतीवर ढाळीचे बांध , गावात नर्सरी करिता 1000 पिशव्या, जुन्या रचना दुरुस्ती मध्ये वन तलाव गळती दुरुस्त करणयात आली. यातुन मनुष्यबळाने 25800.38 घनमीटर काम झाले. या करिता टायगर प्रोजेक्ट चे RFO श्री ए.एस.मोळेकर, वनपाल एस.टी.सोनोने यांनी गावकरी लोकांना सहकार्य केले.

ढाकणा रेंज च्या बोथरा गावात डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन योजना तुन 110 शोषखड्डे, 530 रोपांची रोपवाटिका, वन तलाव गळती दुरुस्ती व गाळ काढणे, रोजगार हमी चे माध्यमातून 5 हेक्टर वन क्षेत्रात सलग समतल चर, 20 हेक्टर शेतीवर ढाळीचे बांध असे 12628.38 घनमीटर काम झाले. स्पर्धेच्या

45 दिवसाच्या कामात वेळोवेळी RFO श्री हिरालाल चौधरी व वनरक्षक श्री अरुण डाखोरे यांनी गावाला श्रमदान करून तसेच प्रशासकीय मदत करत बोथरा गावाला पुढे आणले.

हे काम करतांना वन विभाग बरोबरच पंचायत समिती, कृषी विभाग च्या योजनांचे महत्वाचे योगदान राहिले आहे. त्यामुळे अशा कामात प्रशासकीय एकजूट तितकीच महत्वाची आहे..हे दिसून येते.

भविष्यातील दिशा

11 ऑगस्ट रोजी पुणे इथे झालेल्या सन्मान सोहळ्यात अमीर खान यांनी वॉटर कप व्हर्जन 2 ची घोषणा केली. माती, गवत, जंगल, शेती व पीक पाणी व्यवस्थापन अशा सर्व मुद्यावर गावाची एकजूट व प्रशासकीय सहभाग वाढवत या पाणलोट च्या कामात सातत्य ठेवत काम करणे हेच दुष्काळ मुक्तीच सूत्र आहे.

**धनंजय सायरे**

मेळघाट समनव्यक

पानी फौंडेशन



चुरणी येथे पानी फौंडेशन प्रशिक्षणातील एक क्षण



बोथरा येथील उताराच्या शेतीमध्ये ढाळी चे बांध



आवागड येथे अनघड दगडी बांध व सलग समतल चर



(बोथरा या गावात ढाकना रेंज चे वन कर्मचारी टीमने गावकरी सोबत बांधलेला ढाळीचे बांध)

## #थांब माणसा#

अरे थांब मानवा तू काय करतोय

जंगल नाही रे तू तुझे अस्तित्व मिटवतोय||

अरे थांब मानवा तू काय करतोय

जंगल नाही रे तू तझे घर जळतोय||

अरे थांब मानवा तू काय करतोय

झाड नाही रे तू तुझा पाय तोडतोय||

अरे थांब मानवा तू काय करतोय

जंगल नाही रे तू तुझे अस्तित्व मिटवतोय||

अरे थांब मानवा तू काय करतोय

झाड नाही रे तू तुझा प्राण विकतोय ||

अरे थांब मानवा तू काय करतोय

प्राण्याला नाही रे तू तुझ्या बाळाला मारतोय ||

अरे थांब मानवा तू काय करतोय

जंगल नाही रे तू तुझे अस्तित्व मिटवतोय ||

**कवी:-शांताराम सोळुंके**
वनरक्षक, जरीदा

# # मेळघाट #

निसर्गरम्य असा हा  आगळा-वेगळा प्रवास आहे
||डोंगर द-या अन खो-यांचा ही इथे वास आहे||

मनाला मोहून टाकणारा असा हा प्रवास आहे
||सिपना अन खंडूचा ही इथे वास आहे||

खालून वरती गोल-गोल फिरत जाण्याचा हा एक वेगळाच  प्रवास आहे
||वरती गेल्यावर शहानुर अन गाविलगडचा ही इथे वास आहे||

जिप्सीने जंगलात फिरण्याचा हा वेगळाच असा प्रवास आहे
||कारण जंगला मध्ये प्राण्यांचा सुध्या वास आहे||

खरंच निसर्ग भेटीचा हा एक वेगळाच प्रवास आहे
||कारण इथे वैराट चा ही वास आहे||

**कवी;-शांताराम सोळुंके**
वनरक्षक, जरीदा
मो. नं.: 7875680693

# मचाणावरील रात्र



सारे कसे शांत होते. फक्त आकाशातील तारे पाहूनच आपण पृथ्वीतलावरच आहोत याची खात्री! रात्री 1.30 वाजता मात्र नदीपलीकडून 7 -8 मोरांचा ओरडण्याचा भयाण आवाज. त्या पाठोपाठ थोड्याच वेळात नदीच्या आमच्या बाजूकडून सुद्धा मोरांच्या ओरडण्याचा आवाज. त्यानंतर परत भेकर,सांबर यांच्या ओरडण्याचे आवाज. जंगलचा राजा येत असल्याची ही ललकारीच होती.

मेळघाटातील वाघाचे वास्तव्य क्षणोक्षणी जाणवत असते. जानेवारीतील मेळघाट भेटीत, प्रत्यक्ष मृत झालेल्या जनावराला खाताना वाघाला पाहणे व त्याचे फोटो काढणे अशी खूप दिवसापासून मनातील प्रबळ इच्छा !

आम्ही जाणार त्या तारखेस किंवा त्याआधी अरण्यात जंगली श्वापदाचे किंवा चरावयास आलेल्या घरगुती प्राण्यांची शिकार झाली असल्यास त्याची माहिती देण्याची विनंती वन अधिकाऱ्यांना केली. तीन ठिकाणांबद्दल माहिती मिळाली. एक शिकार सांबाराची होती, त्याची माहिती मिळून तीन दिवस झाले होते. म्हणजे आता काही त्याच्या अंगावर वाघाला खायला मांस राहिले नसणारच. कारण जंगली प्राण्यांची शिकार ताबडतोब रिपोर्ट होऊ शकत नाही व कित्येक वेळा समजले पण जाऊ शकत नाही. दुसरी शिकार चुनखडी येथे गाय मारल्याची होती. त्याला दोन दिवस झाले होते व वाहनाच्या रस्त्यावरून चार कि.मी.आत दोन डोंगरांच्या मध्ये एका नाल्यात होते. म्हणजे मचाण बांधण्यासाठी फारच कठीण. कारण मचाणाचे साहित्य घेऊन जायला फारच अवघड होते. तिसरी घटना रायपूर जवळ हमू रोडवर रस्त्यावरून फक्त 1500 फुटांवर दरीमध्ये नदीच्या बाजूस रेड्यास दोन वाघाने मारले होते. व या घटनेस फक्त 6 तास झाले होते. ही घटना स्वत: गुराखी असताना झाल्याने त्याने वनरक्षकास सांगितली व प्रत्यक्ष जागाही दाखवली. तोपर्यंत वाघाने भक्ष्य जवळ जवळ 200 फुट ओढत ओढत नाल्यात लपलेले होते,. रात्री 10 वाजता आम्हाला घटना कळल्यावर सकाळी लवकर सेमाडोह वरून रायपूरला जायचे ठरले. सकाळी 10 वाजता तेथे पोहोचल्यावर रेंजर वगैरेंना घेऊन भक्ष्यापर्यंत पोहोचलो. वाघाने अजून त्या भक्षाचा कोणताही भाग खाल्ला नव्हता. रेड्याच्या मानेवर वाघाचे सुळे व दांत यांच्या बरोबरच रक्ताच्या सुद्धा खुणा होत्या. रेडा साधारण 250 किलोचा असावा. वाघाने रेड्याला ओढत नेल्याच्या खुणा कित्येक ठिकाणी आढळल्या. जवळच नदी होती. रेंजरच्या माहितीप्रमाणे गेले काही दिवस ही जोडी काही जणांनी पाहिली होती व त्या भागात मेटिंग कॉल्सही खूपदा ऐकू आले होते. नदीवर दोन दोन वाघांच्या जोडीच्या पंजांच्या खुणा सापडल्या. त्यातील बारीक पंजाच्या खुणा मादीच्या असल्याचे जगताप रेंजर यांनी सांगितले. नदीपलीकडे खडक,माती व वाळू असा परिसर होता. एके ठिकाणी वाळूत वाघाच्या संपूर्ण शरीराच्या खुणा, हीच ती मेंटिग करण्याची जागा, सर्वांची उत्सुकता शिगेला पोहोचली. परत शिकारीच्या जागी येऊन झाडांची पाहणी केली व कोणत्या झाडावर मचाण बांधायचे ते ठरवले. परत रायपूर गावात जाऊण मचाणासाठी योग्य ते सामान जमवले. त्यामध्ये बाज,मादी,सुंभ,दोरी इ. चा समावेश ! परत शिकारीच्या जागेवर 1 वाजता पोहोचलो. स्थानिक लोकांच्या मदतीने जमिनीपासून 20 फुटांवर व मेलेल्या रेड्यापासून 80 फुटांवर मचाण बांधायचे ठरले. जवळचीच पडलेली झाडे पाहून त्यांची लाकडे व बांबू इत्यादीच्या साहाय्याने 4 वाजेपर्यंत मचाण बांधून झाले. बाजूने कॅमोफ्लेज होईल असे कंमाडो क्लॉथ सर्व बाजूने लावले. प्रथम दोघांनी बसायचे ठरले होते. परंतु आणखी एका मित्राच्या तीव्र इच्छेखातर तीन जणांनी मचाणावर बसावयाचे ठरले. 7.30 वाजता आमच्याबरोबरचे लोक परत गेले. आम्ही आमचे सामान ज्यात पाणी, भाकरी, बॅटरी, कॅमेरा, व्हिडीओ कॅमेरा, कुऱ्हाड व विळा होता ते घेऊन वरती चढलो. काळोख वाढत चालला होता. हूं का चू करायचे नसल्याने बोलणे बंद बाजूला बांधलेल्या कापडाच्या भोकातून दिसणाऱ्या शिकारीवर सर्व लक्ष केंद्रित केले होते. प्रत्यक्ष मचाण फक्त 2 फुट बाय 5 फुट ह्या आकाराचे असल्याने मांडी घालून बसणेसुद्धा फारच अडचणीचे होते. तरी सुद्धा मानाच्या प्रबळ इच्छेवर वाघाचे दर्शन होणारच याची खात्री होती. जवळच्या झाडावरील टांगलेल्या पिशवीतील पाणी काढायचे म्हटले तरी आवाज होणार म्हणून पाणीसुध्दा प्यायचे टाळले तर खायचे विसराच. रात्री आठ वाजता 3-4 सांबरांचा ओरडण्याचा आवाज आला. तीच वाघ आल्याची पहिली प्रतिक्रिया. परत सर्व शांत. दूरवर पानांचा व दगड घसरल्याचा आवाज आला.

परत सर्व शांत. दूरवर पानांचा व दगड घसरल्याचा आवाज आला परत शांत. वाघ अशा वेळेस कितीही भुकेला असला तरी शिकारीच्या जागेवरील परिस्थितीचे निरीक्षण करूनच भक्ष्याजवळ येतो. आता आम्ही आणखीनच शांत. मांडीची घडी पण बदलणे नाही. पाच तास एकाच अवस्थेत बसून पाठीचा कणा, मान यावर पडत असलेल्या ताणाकडे सुध्दा लक्ष द्यायला फुरसत नव्हती. सर्व लक्ष भक्ष्याकडे येणाऱ्या वाघाच्या हालचालींकडे. थंडीचेच दिवस असल्यामुळे गारठा प्रचंड. अंगात स्वेटर घालून सुध्दा त्याचा काहीच उपयोग होत नाही असे लक्षात आले. पाय गारठायला लागले. हाताची बोटे भिजून गेली. तोंडाच्या वाफेने गरम करावीत तर आवाज होईल म्हणून तेही टाळले. सर्व बाजूस गर्द किर्र जंगल झाडी, रातकिड्यांचा सुध्दा आवाज नाही. सारे कसे शांत होते. फक्त आकाशातील तारे पाहूनच आपण पृथ्वीतलावरच आहोत याची खात्री ! रात्री 1.30 वाजता मात्र पदीपलीकडून 7-8 मोरांचा ओरडण्याचा भयाण आवाज. त्या पाठोपाठ थोड्याच वेळात नदीच्या आमच्या बाजूकडून सुध्दा मोरांच्या ओरडण्याचा आवाज. जंगलचा राजा येत असल्याची ही ललकारीच होती. बरोबर 10 मिनिटातच मचाणाच्या मागील बाजूस असलेल्या डोंगरावरून पालापाचोळ्याबरोबर, दगड घसरत आल्याचा आवाज. आम्ही जास्तच सावध, नजरा सावरून, कान टक्कारून बसलो. आवाज अंदाजे 200 फूटावरून येत होता व एकदम थांबला. परत जवळ जवळ 30 मिनिटे सर्व शांत. शांततेचा भंग केला तो काळजाचा थरकाप उडवणाऱ्या घुबडाच्या भरारीने. आम्ही तरीही स्तब्ध, तहान लागली होती तरीही पाणी प्यावेसे वाटत नव्हते. झोप आली होती, तरीही डोळ्यांवर ताण देऊन झोप उडवून जागायचा प्रयत्न चालला होता. मनात विचार चालले होते की वाघाचे निरीक्षण चालले असणार व त्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातूनच तो निर्णय घेऊन शिकारीच्या जागी येणार किंवा न येणार. आपण त्याला दिसलो का ? आपले मचाण दिसले का ? इत्यादी विचारांचे काहूर मनात उठले होते. लगेचच परत पहिल्याप्रमाणे पाने, दगड इ.चा आवाज 50 फुटापर्यंत आला. बांबूच्या बेटापर्यंत त्याच्या आड बसलेल्या वाघाचे अस्तित्व नक्कीच जाणवले. वाघाच्या शक्तीचे हुशारीचे कौतुक करू तेवढे कमीच ! आता मात्र वाघ दिसणार या विचारांनी मन उचंबळून आले. राजेशच्या हातावर हात ठेवून दाबून आनंद व्यक्त करण्याव्यतिरिक्त काही बोलण्यात अर्थ नव्हता. वाघ अजूनसुध्दा निरीक्षण करत होता व त्याच्या वास्तव्याबद्दल सावधानतेचा भेकराचा आवाज परत आला. शेवटी माणूस हाच जगातील सर्वाधिक क्रूर प्राणी आहे याची खात्री पटली. एवढ्या मोठ्या जंगलाच्या शक्तीवान राजाला आमची थोडी चाहूल लागलीच. माणसाने मारलेल्या प्राण्यांच्या कथा ऐकून व प्रसंग पाहून त्यानेसुध्दा मनुष्य जातीस हिंस्त्र प्राण्यात गणले होते व त्याचा जीव वाचवण्यासाठी त्याने बांबूच्या बेटामागूनच पळ काढला. त्याच्या जाण्याचा आवाज हळू हळू कमी झाला तसेच आमचया व्याघ्रदर्शनाच्या आशाही मावळल्या. वाघाला त्याच्या अन्नाजवळ पोहोचू न दिल्याबद्दल त्याने घेतलेल्या दक्षतेबद्दल कौतुकच वाटले. कदाचित आमच्याऐवजी खऱ्या शिकाऱ्यांच्या हातात बंदूक असतानाच वाघ आला असता तर त्याने त्याला गोळी मारून हाडे, कातडी, नखे, सुळे यासाठी ठारही मारले असते. म्हणूनच खिन्न मनाच्या स्थितीत असतानासुध्दा वाघाला अन्नापासून वर्जित ठेवले, वाघ दिसला नाही या गोष्टीपेक्षा वाघाने दक्षता घेऊन स्वत:ला वाचवले याचेच कौतुक वाटले.

थोड्याच वेळाने पहाटे चार वाजता दोन प्राण्यांचा धावण्याचा आवाज, झाडांना दिलेल्या धडकेचा आवाज, प्राण्याचा विव्हळण्याचा आवाज व शेवटी मिटक्या मारत दूरवर खाल्याचा आवाज. ओळखणे कठीण नव्हतेच काय झाले असावे ते ! मनातील खिन्नता दूर झाली. पहाटेचे सहा वाजले. पहिला आवाज ट्री पाय चा आला. नंतर रान कोंबड्या, मोर व इतर पक्ष्यांचे आवाज व याच बरोबर आमच्या तिघांनाही 13 तासानंतर उमटलेला पहिला शब्द म्हणजे “अविस्मरणीय !”

श्री. प्रमोद नारगोळकर

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक

मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजने अंतर्गत मेळघाटातील स्थानिक बांधवांना मिळणारे लाभ



**अधिक माहिती करीता संपर्कः**

**राम उमेकर** (मो. 8698128692), **आकाश फुसे** (मो. 8381049881)

- **महिलांना शिलाई मशिन प्रशिक्षण**
- **LPG स्वयंपाक गॅस पुरवठा** (शासन अनुदान 75%, लाभार्थी 25%)
- **शेतीला सोलर कुंपन पुरवठा** (शासन अनुदान 75%, लाभार्थी 25%)
- **बायोगॅस सयंत्राचा पुरवठा** (शासन अनुदान 75%, लाभार्थी 25%)
- **संकरीत दुधाळ जनावरे पुरवठा** (जनावराच्या एकुण किंमतीच्या 50% किंवा रूपये 20,000/- , लाभार्थीकडुन 50%)

**डॉ. जयदीप दास** (मो. 9987008320)

- **लाखेपासुन बांगडी प्रशिक्षण**
- **कुक्कुट पालन प्रशिक्षण**
- **स्थानिक नागरिकांना मधुमक्षिका पालन प्रशिक्षण**
- **युवक-युवतींना रोजगार प्रशिक्षण** (मोटर मेकॅनिक, इलेक्ट्रीन, टेलरींग, ए.सी. रिपेरिंग, हॉटेल मॅनेजमेंट व आदराती त्यांचे प्रशिक्षण मिळले)

**स्वप्निल बांगडे** (मो. 8956563016)

- **निसर्ग पर्यटन व गृह पर्यटन माध्यमातून रोजगार** (Home Stay)

कचरा कुंडिचा वापर करू !
स्वच्छ सुदंर परिसर निर्माण करू !!

शौचालय असेल जेथे !
खरी प्रतिष्ठा येईल तेथे !!

दारू वर टाकु बहिष्कार !
व्यसन मुक्तीचा करू पुरस्कार !!

करा पर्यावरणाची रक्षा !
होईल जगाची सुरक्षा!!

# Tariff Chart

(Check-In 12 Noon) & (Check-Out 11 am)

| Location | Room Category *(All Non A/C)* | No. of Rooms | No. of Beds & Persons Allowed | Room Tariff (In Rs.) | Extra Guests | Extra Guests (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|
| **Chikhaldara** | Suites | 03 | 02 | 1,500.00 | - | - |
| **Semadoh** | A Type Cottage | 04 | 03 | 2,000.00 | 1 | 350.00 |
| | Circular Cottage | 06 | 02 | 1,500.00 | - | - |
| | Tents | 06 | 02 | 700.00 | - | - |
| | Group Accommodation *(Dormitory)* | 04 | 16 Beds *(Per Dormitory)* | 350.00 *(Per Bed)* | - | - |
| **Kolkas** | Upper VIP Suites | 02 | 02 | 1,500.00 | 1 | 350.00 |
| | Lower Cottages | 07 | 02 | 1,200.00 | - | - |
| | Dormitory 1 | 01 | 08 Beds *(Per Dormitory)* | 300.00 *(Per Bed)* | - | - |
| | Dormitory 2 | 01 | 06 Beds *(Per Dormitory)* | 300.00 *(Per Bed)* | - | - |
| **Harisal** | Cottages | 04 | 02 | 1,500.00 | - | - |
| | Tents | 08 | 04 | 800.00 | - | - |
| | Ethnic Bamboo Hut | 01 | 02 | 2,000.00 | - | - |
| **Shahanur** | Cottages | 02 | 02 | 1,200.00 | - | - |
| | Eco Huts | 07 | 02 | 1,200.00 | - | - |
| | Eco Tents | 06 | 02 | 1,200.00 | - | - |
| | Dormitory | 02 | 14 Beds *(Per Dormitory)* | 300.00 *(Per Bed)* | - | - |
| **Katepurna** | VIP Suites | 04 | 02 | 1,200.00 | - | - |
| | Delux Huts | 01 | 02 | 1,000.00 | 1 | 200.00 |
| | Eco Huts | 02 | 02 | 500.00 | - | |
| **Dnyanganga** | VIP Suites | 04 | 02 | 1,200.00 | - | - |
| **Lonar** | VIP Suites | 02 | 02 | 1,500.00 | - | - |

## *British Treasured Rest Houses in Melghat Tiger Reserve*

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Dhakna** | Suites | 02 | 02 | 1,500.00 | - | - |
| **Tarubanda** | Suites | 02 | 02 | 1,500.00 | - | - |
| **Rangubeli** | Suites | 02 | 02 | 1,500.00 | - | - |
| **Chaurakund** | Suites | 02 | 02 | 1,500.00 | - | - |
| **Raipur** | Suites | 02 | 02 | 1,500.00 | - | - |
| **Hatru** | Suites | 02 | 02 | 1,500.00 | - | - |

## *Contacts for Home-Stay in Melghat Tiger Reserve*

| | |
|---|---|
| **Harisal** | Ashok Aathawale (8055833898) |
| **Chikhaldara** | Sahebrao Yeole (9764019099) |
| **Semadoh** | Bhola Mawaskar (9272883258 / 8805909738) |
| **Makhala** | Sonak Lal (7057306255) |

**Office of APCCF & FD,**
**Melghat Tiger Reserve,**
Near to Govt. Girls High School, Camp, Amravati - 444 601
**Phone No.: 0721-2662792**
*e-mail: projecttigermelghat@gmail.com*

***For details contact:***
**Mr. Swapnil on +91-8956563016**
*For online accommodation booking*
**www.magicalmelghat.com**
*e-mail: magicalmelghat@gmail.com*

# Melghat JUNGLE SAFARI DETAILS

| Sr. No. | Gate Name | Nearest Location to book for accommodation | Max. Vehicle allowed per day | | Entry Fees Per Vehicle *(In Rs.)* | Guide Fees *(In Rs.)* | Private open Gypsy Rent (optional) *(In Rs.)* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | *Morning* | *Evening* | | | |
| 1. | **Chikhaldara / Vairat** | **Chikhaldara** | 20 | 20 | 400/- | 300/- | ***Note:*** **Gypsies are provided by private party and bookings are done on first come first serve basis. The rent of Gypsy varies from Rs. 1,500/- to 3,000/- and to be paid in cash at the spot.** |
| 2. | **Semadoh** | **Semadoh** | 20 | 20 | 400/- | 300/- | |
| 3. | **Narnala / Dhargadh** | **Shahanur** | 30 | 30 | 400/- | 300/- | |
| 4. | **Wan** | **Shahanur** | 22 | 21 | 400/- | 300/- | |
| 5. | **Ambabarwa** | **Wasali** | 22 | 21 | 400/- | 300/- | |
| 6. | **Harisal** | **Harisal** | 20 | 20 | 30/- (Per Adult)+ 15/- (Under 12 yrs)+ 100/- (Vehicle Entry) | 300/- | |
| 7. | **Wagha** | **Katepurna *(Akola Dist.)*** | 10 | 10 | 30/- (Per Adult)+ 15/- (Under 12 yrs)+ 100/- (Vehicle Entry) | 300/- | |
| 8. | **Botha** | **Dnyanganga *(Buldhana Dist.)*** | 10 | 10 | 30/- (Per Adult)+ 15/- (Under 12 yrs)+ 100/- (Vehicle Entry) | 300/- | |
| 9. | **Jamoda Padaw** | **Harisal / Chaurakund** | 10 | 10 | 30/- (Per Adult)+ 15/- (Under 12 yrs)+ 100/- (Vehicle Entry) | 300/- | |



## TIMINGS

| Period | Morning | | Evening | |
|---|---|---|---|---|
| | Entry | Exit | Entry | Exit |
| **1st October To 31st October** | 6:00am | 10:00am | 14:30pm | 18:30pm |
| **1st November To 28/29th February** | 6:30am | 10:30am | 14:00pm | 18:00pm |
| **1st March To 30th June** | 6:00am | 10:00am | 14:30pm | 18:30pm |

**Elephant Activities : At Kolkas**

Elephant Safari : Rs. 800/- per safari for maximum of 4 pax for half an hour.
Timing: 09.00 am to 12.00 noon & 04.00 pm to 06.00 pm.

Elephant Bathing : Ticket: Rs. 25/- per person Timing: 01.00 pm to 02.00 pm

Elephant Feeding : Ticket: Rs. 25/- per person Timing: 06.00 pm to 07.00 pm


**Adventure Activities: At Shahanur**

Adventure Park : per activity Rs. 50/- per person.

**Kayaking : At Harisal**

Ticket : per person Rs. 50/- for half an hour

**Booking for Activities: on the spot.**



Office of APCCF & FD,
**Melghat Tiger Reserve,**
Near to Govt. Girls High School, Camp, Amravati - 444 601
Phone No.: 0721-2662792
*e-mail: projecttigermelghat@gmail.com*

*For details contact:*
Mr. Swapnil on **+91-8956563016**
*For online accommodation & Safari booking*
**www.magicalmelghat.com**
*e-mail: magicalmelghat@gmail.com*

Melghat Tiger Conservation Foundation



**Photo Feature Credits:**
Abhishek Arorkar
Amol Navghare
Sukrut Chaudhari
Shashank Nagarale
Sharan Raju
Hiralal Chaudhari
Milind Jog

Back Inpage Cover by:
**Rakshita Ukesh**
*(Tree carvings by Bark Beetle)*

Office of

**Additional Principal Chief Conservator of Forest & Field Director, Melghat Tiger Reserve, Amravati.**

***Oriental Scops Owl***



***Grey Morph***



***Rufous Morph***

To,

______________________________

______________________________

______________________________

You are invited to explore the all new accommodation and restaurants at Semadoh, Narnala, Harisal & Kolkas. Melghat team will ensure you will have a great time.

**Website: www.magicalmelghat.com**

**Please feel free to coordinate with Mr. Swapnil, E-mail: magicalmelghat@gmail.com or Call him on +91-895653016. He will help you plan your programme.**

**मेळव्याघ्र मध्ये प्रसिध्द झालेले लिखाण लेखकांची वैयक्तीक विचारधारणा आहे.**
**मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानास प्राप्त होणाऱ्या देणग्या, आयकर अधिनियमाच्या कलम 80 जी अंतर्गत 50% आयकर सवलतीस पात्र आहे. निसर्ग संवर्धनाला मदत करा आणि आयकरात मदत करा व आयकरात सूट मिटवा. प्रतिष्ठानचे बँक खाते मेळघाट व्याघ्र प्रकल्प प्रतिष्ठान या नावे ॲक्सिस बँक लि., अमरावती (महा.) च्या शाखेत आहे. खाते क्र. 91510002574231, IFS Code: UTIB000265**